रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ३९ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

### शिवसेना पक्षाचा निकाल ऑगस्टमध्ये

**मुंबई :** शिवसेना हा पक्ष आणि धनुष्यबाण हे चिन्ह एकनाथ शिंदे यांना देण्याच्या निर्णयाला उद्धव ठाकरे यांनी आव्हान दिले होते. या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सोमवारी (दि.१४) सुनावणी पार पडली. सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमल्या बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. मुख्य याचिकेवर निर्णय करणे योग्य राहील, असे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सुनावणीवेळी म्हटले. याप्रकरणी सुनावणी पुढे ढकलताना ऑगस्ट महिन्यातील तारीख देऊ. तोपर्यंत जर निवडणुका लागल्या, तर निवडणूक लढा, असेही न्यायमूर्ती यांनी यावेळी स्पष्ट केले.


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. १५ जुलै २०२५

किंमत ४ ₹


### मुंबई विमानतळावर ट्रकची विमानाला धडक

**मुंबई :** मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एक मोठी घटना घडली आहे. अकासा एअरलाइन्सचे विमान एका मालवाहू ट्रकला धडकले आहे. अपघातानंतर एअरलाइन्सने जारी केलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, विमान उभे असताना एका थर्ड पार्टी ग्राउंड हँडलरने चालवलेल्या मालवाहू ट्रकने विमानाला धडक दिली. यावेळी विमानाचे पंख आणि ट्रकमध्ये अडकले होते. सध्या विमानाची सखोल चौकशी केली जात आहे. आम्ही तृतीय पक्षाच्या ग्राउंड हँडलरसह घटनेची चौकशी करत आहोत, असे सांगितले.

# योजना वाऱ्यावर, अधिकारी धारेवर

## नाव न घेता आ. दळवींचेही खा. तटकरेंनी टोचले कान

| अलिबाग | प्रतिनिधी |

**मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेपासून जिल्ह्यात दिव्यांगांसाठी शिबीर घेणे, बैठकीत अनुपस्थितीत अधिकारी, घनकचरा व्यवस्थापन, जलजीवन योजना, योजनांचे माहिती फलक लावणे, अशा अनेक प्रश्नांवर जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीच्या (दिशा) आढावा बैठकीत शासकीय योजनांचे वाभाडे काढण्यात आले. आरोग्य विभागासह ग्रामीण पाणीपुरवठा विभाग व अन्य विभागाच्या भोंगळ कारभारावर ताशेरे ओढले. योजनांची अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून होत नसल्याची नाराजी या बैठकीत व्यक्त करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांसह सर्व विभागातील अधिकाऱ्यांना धारेवर घेण्यात आले. लोकप्रतिनिधींना हलक्यात घेऊ नका, अशीही यावेळी तंबी भरण्यात आली. दरम्यान, मतदारसंघातील अपूर्ण कामांबाबत आमदार दळवींचेही नाव न घेता खासदार तटकरेंनी कान टोचले.**



खासदार श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक सोमवारी (दि.१४) जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात घेण्यात आली. यावेळी खा. सुनील तटकरे, खा. धैर्यशील पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्ह्यातील वेगवेगळ्या विभागातील अधिकारी उपस्थित होते.

ग्रामीण भाग रस्त्यांनी जोडला पाहिजे, यासाठी ग्रामसडक योजनेंतर्गत जिल्ह्यात ठिकठिकाणी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेची कामे घेण्यात आली आहेत. काही ठिकाणी कामे अपूर्ण स्थितीत आहेत, काही ठिकाणी कामाला सुरुवातही झाली नाही. त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना होत आहे. त्याबाबत या बैठकीत मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्यात अनेक ठिकाणी रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील अनेक कामे गेल्या अनेक वर्षांपासून रखडली आहेत. याबाबत समिती सदस्यांनी नाराजी व्यक्त करून जे ठेकेदार रस्त्याची कामे करीत नाहीत, त्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकून तातडीने नवीन टेंडर काढण्यात यावे. ज्या रस्त्यांच्या कामांचे नवीन टेंडर काढून ठेकेदार नियुक्त करण्यात आला आहे. त्यांना तातडीने कामे सुरू करण्याच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच ते काम करण्यास योग्य आहेत, की नाही, याची पडताळणी करावी, अशी सूचना संबंधित अधिकाऱ्यांना समितीने दिल्या.

दिव्यांगांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी जिल्हाभरात शिबिरे घेण्याच्या सूचना यापूर्वी देण्यात आल्या होत्या. मात्र, या सूचनांचे पालन जिल्हा परिषद आरोग्य विभाग, जिल्हा शल्य चिकित्सकांकडून केले नाही. त्यामुळे दिव्यांग योजनांपासून वंचित असल्याचे उघड झाले. आरोग्य विभाग दिव्यांगांच्या अतिशय असंवेदनशीलपणे कारभार का करीत आहे, असा सवाल समितीने उपस्थित केला. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरवस्थेसह वैद्यकीय अधिकारी मुख्यालयात राहात नसल्याचा प्रकारही या बैठकीत समोर आला. याबाबत त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. याबाबत जिल्हा पान २ वर

### घनकचरा प्रश्नांवर गंभीर चर्चा

**रायगड जिल्ह्यातील घनकचरा व्यवस्थापनाबाबत या बैठकीत आढावा घेण्यात आला. सिडको व इतर यंत्रणाच्या अखत्यारित येणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ग्रामपंचायतींवर सोपविली जाते. यामध्ये सिडकोसह अन्य यंत्रणा काम करीत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली. गावांच्या वेशीवरच कचऱ्यांचा ढिगारा असतो. दुर्गंधी निर्माण होते. हा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी उपाययोजना कराव्यात. दुर्गंधी रोखण्यासाठी सिडको व एमएमआरडीने घनकचरा प्रकल्प उभारणे आवश्यक आहे, अशी सूचना करण्यात आली. यातून वीजनिर्मितीसाठी पुढाकार घ्यावा, असेही सांगण्यात आले.**

### शल्यचिकित्सकांविरोधात हक्कभंगाचा ठराव

**जिल्ह्यातील दिव्यांगांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी जिल्ह्यातील रुग्णालयासह उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर शिबीर घेण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत पत्र काढण्याच्या सूचना खासदार सुनील तटकरे यांनी दिल्या होत्या. परंतु, जिल्हा शल्यचिकित्सक यांनी त्या सूचनांचे पालन केले नाही. दिव्यांगांसाठी शिबिरही घेतली नाही. शल्यचिकित्सक डॉ. निशीकांत पाटील यांच्या कामकाज पद्धतीबाबत नाराजी दिशा समितीच्या बैठकीत त्यांनी व्यक्त केली. डॉ. निशिकांत पाटील यांच्याविरोधात हक्कभंगाचा ठराव केला जाणार असून, त्याचा अहवाल सरकारकडे पाठविला जाईल, असे खासदार तटकरे यांनी सांगितले.**

### आ. दळवींच्या मतदारसंघातच कामे अपूर्ण

**जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची (दिशा) आढावा बैठक सोमवारी घेण्यात आली. या बैठकीत मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या कामांचा आढावा घेण्यात आला. ही कामे वर्षानुवर्षे पूर्ण न झाल्याने नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. ठेकेदारांना मुदत वाढवून देऊनही कामे पूर्ण होत नाही, ही खंत बैठकीत व्यक्त करण्यात आली. विकासाच्या बाता मारणाऱ्या आमदारांच्या मतदारसंघातील मुरूड व अलिबाग तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेची कामे अपूर्ण असल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनीच या बैठकीत उघड केले.**

# चिनी फटाक्यांचे सात कंटेनर उघडकीस

## ३५ कोटींचा बेकायदेशीर स्फोटक माल जप्त

| उरण | वार्ताहर |



देशाच्या सुरक्षेला सुरुंग लावणाऱ्या काळा बाजारांना आता महसूल गुप्तचर संचालनालयाने चांगलाच झटका दिला आहे. 'ऑपरेशन फायर ट्रेल' या गुप्त मोहिमेतून मुंबई विभागीय युनिटने एक धडाकेबाज कारवाई करत न्हावा शेवा बंदर, मुंद्रा बंदर आणि कांडला (सेझ) येथून चक्क ३५ कोटींचे चिनी फटाके असलेले सात कंटेनर्स जप्त केले आहेत. या फटाक्यांचे वजन तब्बल १०० मेट्रिक टन असून, हे संपूर्ण स्फोटक साठवण खोट्या घोषणांच्या आड लपवण्यात आले होते.

मिनी डेकोरेटिव्ह प्लांट्स, आर्टिफिशियल फुले व प्लास्टिक मॅट्स अशा बिनधोक वस्तू म्हणून जाहीर करून देशात बेकायदेशीरपणे फटाके डंप करण्याचा कट आखला गेला होता. मात्र, डीआरआयच्या अत्यंत बारकाईच्या कारवाईने हा स्फोटक कट उधळून लावला. या फटाक्यांत लाल शिसे, लिथियम, तांबे ऑक्साईडसारखी अत्यंत धोकादायक रसायने आढळली असून, कोणताही परवाना न घेता या मालाची आयात करण्यात आली होती. भारताच्या विदेश व्यापार धोरण व २००८ च्या स्फोटक नियमांनुसार, फटाक्यांची आयात ही प्रतिबंधित श्रेणीत मोडते. त्यामुळे स्फोटक सुरक्षा संघटनेकडून परवानगी घेणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. मात्र, या सर्व नियमांना हरताळ फासत, सेझ युनिटच्या माध्यमातून देशांतर्गत वितरणासाठी ही मालवाहतूक सुरू होती. ही केवळ तस्करी नव्हे, तर राष्ट्रीय सुरक्षेच्या मुळावर उठलेला गंभीर हल्लाच होता. कारण, एवढ्या मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर स्फोटक माल पान २ वर

### तरुणाची पेट्रोल टाकून आत्महत्या

| डोंबिवली | प्रतिनिधी |

मलंगगड जवळील कुशवली येथे पहाटेच्या सुमारास एका तरुणाने अंगावर पेट्रोल ओतून घेत आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. किरण परब असे मृत तरुणाचे नाव असून, कर्जबाजारी झाल्यामुळे त्याने आत्महत्या केल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. तो ऑनलाईन गेममुळे कर्जबाजारी झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला आहे. या घटनेची हिललाईन पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण पूर्वेतील संतोष नगर परिसरातील किरण परब याने सोमवारी पहाटे चारच्या सुमारास किरणने घर सोडले आणि कुशिवली गावातील धबधब्याच्या परिसरात तो गेला. त्यानंतर दुचाकीमधील पेट्रोल अंगावर ओतून त्याने स्वतःला पेटवून घेत पान २ वर

# पोयनाडचा पोलीस अधिकारी निलंबित

| अलिबाग | प्रतिनिधी |

रायगड पोलीस दलातील पोयनाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष दराडे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याविरोधात पुणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याने ही कारवाई केल्याची माहिती पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून प्राप्त झाली आहे.

संतोष दराडे हे गेल्या दीड वर्षापासून पोयनाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी अलिबाग पोलीस ठाण्यातदेखील सेवा केली आहे. त्यांच्याविरोधात पुणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अत्याचारप्रकरणी गुन्हा दाखल झाल्याची चर्चा पोलीस दलात सुरू आहे. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांचा मोबाईल बंद आहे. त्यांच्याविरोधात झालेल्या कारवाईची कागदपत्रे रायगड पोलिसांकडे प्राप्त झालेली नाहीत. परंतु, त्यांच्याविरोधात निलंबनाची कारवाई झाल्याची माहिती पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी दिली आहे.

रायगड पोलीस दलातील पोलीस अधिकाऱ्यावर झालेल्या गुन्ह्याबाबत एकच खळबळ उडाली आहे. एका महिलेने या अधिकाऱ्यविरोधात तक्रार दिल्याची चर्चा जोरात सुरू आहे. त्यामुळे रक्षणकर्त्याकडूनच महिला अत्याचाराचे गुन्हे घडत असल्याने दाद कोणाकडे मागायची, असा प्रश्न जनसामान्यांतून उपस्थित होत आहे.

# माणगाव-जामखेड एसटी बस कलंडली

## चालकासह सहा प्रवासी जखमी

| माणगाव | प्रतिनिधी |



माणगावहून जामखेडकडे निघालेल्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसला कोस्ते बुद्रुक गावाजवळ अपघात झाला. हा अपघात सोमवारी (दि.१४) सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास घडला. या बसमध्ये एकूण २९ प्रवासी प्रवास करीत होते. बस चालकासह सहा प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली असून, जखमींना तातडीने माणगाव ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी हलवण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, माणगाव एसटी आगाराची माणगाव-जामखेड ही बस सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास निजामपूर स्वारगेटमार्गे जामखेड येथे निघाली होती. ती बस कोस्ते बुद्रुक गावाजवळ एका छोट्याशा वळणाजवळ आली असता समोरून दुसरी एसटी बस आली. या दोन्ही एसटी समोरासमोर आल्याने मोठा अपघात टाळण्यासाठी जामखेडकडे जाणाऱ्या बस चालकाने एसटी रस्त्याच्या कडेला घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, एसटीचा वेग आणि पावसाळ्यात झालेला निसरडा रस्ता यामुळे साईडपट्टीवरून गाडीचे नियंत्रण सुटले आणि रस्त्याकडेला कलांडली. अपघातात बसचालक बाळासाहेब जोडगे, वाहक सुनील केवड यांच्यासह प्रवासी दत्तू सुतार (८६), बाबू शिंदे (७०), विकास जाधव (७२), विठ्ठल ढोकळ असे सहा प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. जखमींना माणगाव उपजिल्हा रुग्णालयात पुढील उपचारार्थ दाखल करण्यात आले. पान २ वर

### डोंगरावरून पडून तरूणाचा मृत्यू

| नवीन पनवेल | वार्ताहर |

आदई धबधब्याजवळील डोंगरावरून पडून एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि.१३) दुपारी तीनच्या सुमारास घडली. रवी गाडेकर (२४) असे मृत तरुणाचे नाव आहे. सोमवारी चेंबूर येथून पाच जण आदई धबधब्याजवळील डोंगरावर गेले होते. त्यावेळी रवी गाडेकर याचा डोंगरावरून पाय घसरला आणि तो खाली पडला. त्यात त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती खांदेश्वर पोलिसांना दिल्यानंतर पोलीस आणि अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. या घटनेची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास ते करित आहेत.

# पोलादपूर आरोग्यव्यवस्थेची अनास्था उघड

## रूग्णवाहिकेमध्येच महिलेची प्रसुती; नवजात अर्भकाचा मृत्यू

| पोलादपूर | प्रतिनिधी |

ओंबळी धनगरवाडीतील महिलेला १०८ ऐवजी १०२ रूग्णवाहिकेतून पोलादपूर ग्रामीण रूग्णालयात आणताना तिची रूग्णवाहिकेमध्येच प्रसूती झाली. मात्र, नवजात अर्भकाचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे पोलादपूर तालुक्यातील आरोग्य व्यवस्थेची रूग्णांप्रती पुन्हा एकदा अनास्था उघडकीस आली आहे.

पोलादपूर तालुक्यातील ओंबळी धनगरवाडी गौळवाडीतील महिला चंद्रा महादेव बर्गे यांना बाळंतपणासाठी सोमवारी (दि.१४) पोलादपूर ग्रामीण रूग्णालयात आणण्यासाठी १०८ रूग्णवाहिकेची मागणी करण्यात आली. मात्र, पुणे येथून या गाडीचे व्यवस्थापन होईपर्यंत अर्ध्या तासाहून अधिक काळ जाण्याची शक्यता लक्षात घेत ग्रामीण रूग्णालयात उपलब्ध १०२ रूग्णवाहिका पाठविण्यात आली. या महिलेला ग्रामीण रूग्णालयात नेत असताना पैठण गावाजवळ तिला अस्वस्थ वाटू लागली. दरम्यान, आशा सेविकेने परिचारिकेला रूग्णवाहिकेसोबत राहण्यास सांगितले. मात्र, परिचारिकेने कोतवाल खुर्द येथे जाण्याचे कारण पुढे करीत प्रसवपिडा होणाऱ्या महिलेकडे दुर्लक्ष केले आणि ती निघून गेली. त्यानंतर काही वेळाने चंद्रा बर्गे या महिलेची १०२ रूग्णवाहिकेतच प्रसूती होऊन काही कालावधीतच नवजात अर्भकाचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर ही बाब पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेखा बोराडे यांच्या कानावर घातल्यानंतर पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये १०२ रूग्णवाहिकेतून माता आणि मृत बालक यांना आणण्यात आले.

यावेळी चंद्रा बर्गे ही महिला सुरूवातीपासूनच नाजूक परिस्थिती होती. तिची विशेष देखभाल करण्याची आवश्यकता असताना ऐन प्रसूतीवेळी महिला परिचारिकेने रूग्णवाहिकेत सोबत राहणे टाळले आणि त्यामुळे नवजात बाळाच्या जिवावर बेतले, अशी बाब संबंधित आशासेविका आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेखा बोराडे यांच्याशी चर्चेदरम्यान ओंबळी ग्रामस्थांना जाणवली. त्यामुळे ही बाब ग्रामीण पान २ वर

> **रूग्णालयाच्या वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. पाटील यांच्याकडून याबाबतची सविस्तर माहिती मिळाली आहे. त्यामुळे या घटनेची गांभिर्याने दखल घेत जाईल. प्रसुती रूग्णाबाबत जिल्हास्तरावर आढावा घेतला जात असल्याने यासंदर्भातील ढिसाळ कारभाराची नक्कीच दखल घेतली जाईल.**
>
> **– डॉ. नितीन बावडेकर, तालुका आरोग्य अधिकार**

## ४० चौ. मीटरच्या भूखंडाचा मार्ग मोकळा | मनोज कोळी, मयूर कोळी यांच्या पाठपुराव्याला यश

# नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांना मिळाला न्याय

| उरण | प्रतिनिधी |

पनवेल तालुक्यातील गव्हाण येथील प्रकल्पग्रस्त तथा सामाजिक कार्यकर्ते मनोज कोळी, मयूर कोळी यांनी भूमीहीन प्रकल्पग्रस्तांना ४० चौरस मीटर भूखंड मिळावे यासाठी वेळोवेळी महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग, सिडको महामंडळाकडे वारंवार पाठपुरावा केला होता. मात्र, सिडको प्रशासन दाद देत नव्हते. त्यामुळे त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयात प्रकल्पग्रस्तांची बाजू ॲड. प्रियांका ठाकूर यांनी उत्तमपणे मांडली आणि त्यांच्या लढ्याला यश आले. उच्च न्यायालय मुंबईने भूमीहीन शेतमजूर, मिठागर कामगार आणि बारा बलुतेदार यांच्या बाजूने निकाल दिला आहे. त्यामुळे भूमीहीन प्रकल्पग्रस्त यांना ४० चौरस मीटर भूखंड मिळणार आहे. या निर्णयामुळे ठाणे व रायगड जिल्ह्यासह नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त संघटना संस्थांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

नवी मुंबई प्रकल्पाकरिता ९५ गावांच्या जमिनीचे संपादन झाले होते. हजारो शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या मोबदल्यात १२.५ टक्के भूखंड मिळाले. मात्र, या प्रकल्पात भूमीहीन बारा बलुतेदार असलेले अनेक प्रकल्पग्रस्त शेती व्यवसायापासून वंचित झाले. अनेक शेतकरी कसत असलेल्या जमिनींची त्यांच्या नावे नोंद नसल्याने ते पूर्णपणे भूमीहीन झाले. या शेतकऱ्यांसाठी शासनाने स्वतंत्र जीआर काढत या भूमीहीन प्रकल्पग्रस्तांना ४० चौरस मीटर भूखंड देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, अनेकवेळा अर्ज करूनदेखील सिडको प्रशासन हे भूखंड देण्याबाबत टाळाटाळ करीत होते. अखेर २०२२ साली पनवेल तालुक्यातील गव्हाण गावातील शेतकरी मनोज कोळी आणि मयूर कोळी यांच्या माध्यमातून ॲड. प्रियांका ठाकूर यांनी उच्च न्यायालयात रीट याचिका दाखल केली. या याचिकेत कोळी बंधूंनी सिडको प्रशासन कशाप्रकारे भूखंड देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे खंडपीठासमोर मांडले. पान २ वर




> **नवी मुंबई प्रकल्पात ९५ गावांतील शेतकऱ्यांना साडेबारा टक्के भूखंड वितरित करण्यात आले. मात्र, जे बारा बलुतेदार भूमीहीन शेतकरी आहेत, त्यांना ४० चौरस मीटरच्या भूखंडासाठी आजही झगडावे लागत आहे.आम्ही दाखल केलेल्या रिट याचिकेचा निर्णय ऐतिहासिक आहे. या निकालाच्या आधार जे भूमीहीन प्रकल्पग्रस्त शेतकरी आहेत, त्यांना सिडकोच्या माध्यमातून ४० चौरस मीटरचा भूखंड मिळण्यास मदत होणार आहे.**
>
> **– मनोज कोळी,** शेतकरी, गव्हाण-पनवेल

# मुरूड-अलिबाग मार्गावर अपघात

| रेवदंडा | प्रतिनिधी |




मुरूड तालुक्यातील बारशीव गावानजीकच्या वळणावर एका चारचाकी वाहनाने रस्त्याच्या विरूद्ध बाजूने येत समोरून येणाऱ्या दुचाकीला उडविले. यामध्ये दुचाकीस्वारासह पाठीमागे बसलेला जागीच ठार झाला. दरम्यान, घटनास्थळावरून पोबारा केलेल्या चारचाकी वाहनाला रेवदंडा पोलिसांनी रोहा चेकपोस्ट येथून ताब्यात घेतले. ही घटना रविवारी (दि.१३) सायंकाळच्या सुमारास घडली.

मुरूड येथील अक्षय किसनलाल जयस्वाल (२७) हा त्याचा मित्र लालचंद्र रामप्रसाद गौड (३५) याला दुचाकीवर मागे बसवून रविवारी सायंकाळी मुरूडकडे जात होता. बारशीवनजीक साई गेस्ट हाऊस समोरील रस्तात आले असताना, समोरून विरूद्ध दिशेने भरधाव येत असलेली मारूती एसक्रॉस (एमएच-०६-बीयू-२७४४) ही चारचाकी गाडी त्या दुचाकीला समोरून ठोकर दिली. या अपघातात दुचाकीस्वार अक्षय व लालचंद यांना गंभीर स्वरूपाची दुखापत होऊन दोघांचाही मृत्यू झाला. संदीप प्रभाकर म्हात्रे असे मारूती गाडीचालकाचे नाव असून, जखमींना रूग्णालयात दाखल न करता त्याने घटनास्थळावरून पोबारा केला. या अपघाताबाबत मजगाव येथील दयाशंकर जयस्वाल यांनी मारूती गाडीचालक संदीप म्हात्रे याच्याविरोधात रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्याची दखल घेत रेवदंडा पोलिसांनी शिताफीने फिल्डींग लावून रोहा चेकपोस्ट येथून चालकाला ताब्यात घेतले. अधिक तपास रेवदंडा पोलीस करत आहेत.

## पान १ वरून

## योजना वाऱ्यावर, अधिकारी धारेवर

परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनीदेखील गांभीर्याने लक्ष द्यावे, अशा सूचना करण्यात आल्या.

जिल्ह्यामध्ये जलजीवन योजना राबवून करोडो रुपये खर्च करण्यात आले. परंतु, आजही अनेकजण पाण्यासाठी वणवण करीत आहेत. जिल्ह्यात किती नागरिकांना प्रत्यक्ष पाणी मिळते, याचा आढावा तात्काळ देण्यात यावा, अशी सूचना जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर यांना दिल्या. फक्त कागदावरील आकडेवारी दाखवू नका, असे यावेळी सांगण्यात आले.

जिल्ह्यातील ग्रामपंचायती, रास्त भाव दुकानांच्या बाहेर शासनाच्या विविध योजनांची माहिती फलक लावणे बंधनकारक आहे. फलक लावण्याची कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अधिकाऱ्यांनी सूचनांचे पालन गांभीर्याने करावे, अन्यथा कारवाईस सामोरे जावे, असा इशाराच यावेळी देण्यात आला आहे.

**गैरहजर अधिकाऱ्यांवर होणार कारवाई**

सिडकोसह नैना प्रकल्प, एमएमआरडी अशा अनेक विभागांचे अधिकारी बैठकीमध्ये गैरहजर असतात. अनेक वेळा पत्रव्यवहार करूनही अधिकारी अनुपस्थितीत राहतात. कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. तरीदेखील अधिकारी गांभीर्याने घेत नाही, त्यामुळे या अधिकाऱ्यांविरोधात समितीमार्फत कारवाई केली जाणार आहे. याबाबतचा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्याच्या सूचना यावेळी खासदार श्रीरंग बारणे यांनी दिल्या.

## माणगाव-जामखेड बस कलंडली

घटनेची माहिती मिळताच माणगाव एसटी आगार व्यवस्थापक छाया कोळी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तसेच, माणगाव उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी, माणगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बेलदार, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक लाड, उपनिरीक्षक ढाकणे, पोलीस कर्मचारी शिवराज बांडे, सुमित जाधव यांनी घटनास्थळी पोहोचल्यानंतर या मार्गावरील वाहतूक सुरळीत केली. दरम्यान, दिवसेंदिवस एसटी बसच्या वाढत्या अपघाताच्या घटनांमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांना मिळाला न्याय

यावेळी कोळी यांनी गव्हाण येथील १९६७ चे घर नंबर ६६ 'ब' रहिवासी पुरावादेखील त्यांनी सोबत जोडला होता. त्याबाबत उच्च न्यायालयातील खंडपीठाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि निला गोखले यांच्या खंडपीठाने सिडकोला याचिकाकर्त्यांनी सादर केलेले पुरावे ग्राह्य धरण्यास सांगितले. तसेच, ४० चौरस मीटरचे भूखंड वाटपाबाबतच्या निर्णयाचे अवलोकन करण्याचेदेखील स्पष्ट निर्देश दिले. कोणताही शासकीय पुरावा या योजनेसाठी पात्र असल्याचे खंडपीठाने म्हटल्याने अनेक भूमीहीन प्रकल्पग्रस्तांना या याचिकेच्या आधारे आपल्या हक्काचे भूखंड मिळणार आहेत. यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

## चिनी फटाक्यांचे सात कंटेनर उघडकीस

देशात शिरला असता, तर कुठल्याही क्षणी अपघात, स्फोट किंवा लॉजिस्टिक साखळीतील गंभीर दुर्घटना होण्याची शक्यता होती. बंदराच्या सुरक्षेपासून ते संपूर्ण वाहतूक व्यवस्थेपर्यंत याचा भयंकर फटका बसला असता. या कारवाईमागे असलेल्या सूत्रधाराची डीआरआयने ओळख पटवली असून, त्याला अटक करण्यात आली आहे. संबंधित सेझ युनिटमधील एक भागीदार असल्याचे उघड झाले असून, त्याला न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आले आहे.

## पोलादपूर आरोग्यव्यवस्थेची अनास्था उघड

त्यामुळे ही बाब ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. पाटील यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन बावडेकर यांना सविस्तर वृत्तांत सांगितला. यावेळी डिलिव्हरी पेशंटबाबत जिल्हास्तरावर आढावा घेतला जात असल्याने यासंदर्भातील ढिसाळ कारभाराची नक्कीच दखल घेतली जाईल, अशी माहिती डॉ. बावडेकर यांनी दिल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले.

तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन बावडेकर हे गेले काही दिवस आयसोलेशनमध्ये असून, सेवेवर रूजू झाली नाहीत आणि रजेवरही नाहीत, अशी माहिती प्राप्त झाली आहे. त्यामुळे अधिकृतरित्या डिलिव्हरी रुग्णाबाबत हेळसांड करणाऱ्या परिचारिकेवर काय कारवाई होईल, हे कोणीही ठामपणे सांगू शकले नाही. परंतु, अशा प्रकारे निष्काळजीपणा दाखवणाऱ्या परिचारिकेवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

## तरुणाची पेट्रोल टाकून आत्महत्या

आत्महत्या केली. आगीच्या ज्वाळा परिसरात दिसून आल्याने स्थानिकांनी तातडीने याबाबत हिललाईन पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन आगीवर नियंत्रण मिळविले. त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. तपासादरम्यान असे कळले की, किरण याच्यावर खासगी बँकेचे ३ लाख ५० हजारांचे कर्ज होते. तसेच, आईच्या दागिन्यांवरदेखील त्याने दीड लाखांचे कर्ज घेतले होते. त्याला ऑनलाईन गेम खेळण्याचे वेड होते. त्यातून तो कर्जबाजारी झाला असावा, आणि त्यामुळे आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, त्याला अद्याप कोणीही दुजोरा दिलेला नाही.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांना खाली नमूद केलेल्या मिळकतीबाबत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती मिनाक्षी हर्षद दवे, निरू नितीन दवे आणि जयसिंग अंबाप्रसाद दवे यांचे मालकीहक्क व ताबा वहीवाटीची खातरजमा करणेची आहे. सदर मिळकतीवरील मालकीहक्क व ताबा निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, मौजे कामथ, ता. अलिबाग येथील:-**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हेक्टर आर. चौरस मिटर | आकार रू.पै. |
|---|---|---|
| ४६४/३ | ०-०७-० | ३.१२ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकतीवर विद्यमान मालकांचा निर्वेध मालकीहक्क व ताबा वहिवाट आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :-१५/०७/२०२५

ॲड. उमेश गणेश आठवले
''कल्याणी सोसायटी'', तिसरा मजला,
बालाजी नाका, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड.

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक सौ. जया सुभेंद्र रॉय यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे कडाव, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ११७/५/अ, यांचे एकुण क्षेत्र ०.५६.०० गुंठे विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा,बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.
दिनांक : १५/०७/२०२५

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस हया नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे तळवली, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रविंद्र गजानन भोवर, सौ. शिल्पा चंद्रकांत भगत व सौ. स्नेहलता राजाराम सावंत यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| तळवली, ता. मुरुड, जि. रायगड | २६०/२ | जिरायत ०-९१-२० वरकस ०-३४-०० पो.ख. ०-१२-४० | २३.६९ |
| | | १-३७-६० | |

वर नमृद मिळकतींपैकी श्री. रविंद्र गजानन भोवर यांच्या हिश्याचे क्षेत्र ०-१८-०० हे.आर.चौ.मी, पो.ख. ०-०२-०० हे.आर.चौ.मी, एकूण क्षेत्र ०-२०-०० हे.आर.चौ.मी व सौ. शिल्पा चंद्रकांत भगत व सौ. स्नेहलता राजाराम सावंत यांच्या हिश्याचे क्षेत्र ०-१८०० हे.आर.चौ.मी, पो.ख. ०-०२-०० हे.आर.चौ.मी एकूण क्षेत्र ०-२०-०० हे. आर. चौ. मी हे या जाहीर नोटीसीचा विषय आहेत.

अलिबाग,
दि. १५/०७/२०२५

सही/-
**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
रितुराज प्लाझा, शिवाजी चौकासमोर
अलिबाग तळमजला, फ्लॅट नं. १
मो. ०९८५००४२२३४

प्रो. जमा रू..../-

अर्जदारांतर्फे वकील
ॲड. प्रशांत परशुराम वाघमारे

**जाहीर नोटीस**
**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश सा़ो. 'व' स्तर यांचे कोर्टात.**

दिवाणी चौकशी अर्ज : ६८२/२०२५
निशाणी नं. ११/D
ने.ता. ११/०८/२०२५

१. कु. जयेश धर्मा कोली उर्फ कोळी
वय : ३० वर्षे, व्यवसाय : नोकरी
पत्ता : २२२, कोळीवाडा, तळोजा पाचनंद,
तळोजे मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड
२. कु. राहुल धर्मा कोली उर्फ कोळी
वय : २७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
पत्ता : २२२, कोळीवाडा, तळोजा पाचनंद,
तळोजे मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड.
३. सौ. निकिता आनंद म्हणेरे
लग्नापुर्वीची कुमारी निकिता धर्मा कोली उर्फ कोळी
वय : २९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
पत्ता : धम्मदीप नगर, बुध्द विहारच्या बाजूला,
आंबिवली पूर्व, गाळेगांव, मोहोने, कल्याण, ठाणे
४. श्रीमती . अनुसाया उर्फ अनुसया धर्मा कोली उर्फ कोळी
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : गृहीणी
पत्ता : २२२, कोळीवाडा, तळोजा पाचनंद,
तळोजे मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील व अर्जदार क्र. ४ यांचे पती कै.धर्मा महादेव कोळी हे दिनांक ०४/०२/२०२४ रोजी एम. जी. एम हॉस्पिटल, कामोठे या ठिकाणी मयत झाले आहेत.

अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील व अर्जदार क्र. ४ यांचे पती कै. धर्मा महादेव कोळी यांच्या स्वकष्टार्जित स्वतंत्र मालकीची पनवेल महानगरपालिका/सिडको यांच्या हद्दीतील, सब- रजिस्टर साहेब पनवेल यांच्या अधिकार क्षेत्रातील मौजे- तळोजा, पाचनंद (पेंधर) फेज - २, तालुका - पनवेल, जिल्हा- रायगड येथील खालील नमुद दोन निवासी सदनिका मिळकती आहेत. सदर सदनिकां मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे.

**सदनिका मिळकतींचे वर्णन**
**मौजे तळोजा पाचनंद (पेंधर) फेज - २,**
**तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| क्र | ईमारतीचे नाव | सदनिका क्रमांक | विंग | मजला | प्लॉट क्रमांक | सेक्टर | क्षेत्र चौ. मी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | चारधाम को.ऑ. हौ.सो.लि. | ३०१ | बी | तिसरा मजला | ७८ | २३ | ३९.१०१ (कार्पेट) व ४.०५० (टेरेस) |
| २ | चारधाम को.ऑ. हौ.सो.लि. | ३०२ | बी | तिसरा मजला | ७८ | २३ | ३९.१० (कार्पेट) व ४.०५० (टेरेस) |

त्या अर्थी सदर अर्जदारास त्यांचे मागणीप्रमाणे कै. धर्मा महादेव कोळी यांचा वारस दाखला मिळण्याकरीता अर्जदारांनी कै. धर्मा महादेव कोळी यांचे वारस असल्यासंबंधी मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी सदर अर्जदारांस त्यांचे मागणीप्रमाणे अर्जदाराच्या लाभांत देण्यास कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा ईसमांने त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदपत्रांनिशी पुराव्यानुसार सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील ''१ महिन्यांचे'' आत मे. कोर्टात सादर करावी. विहीत मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास, सदर अर्जदारांस त्यांचे मे. न्यायालयातील विनंतीप्रमाणे वारसदाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दिनांक १४ माहे ०७ सन २०२५ रोजी सहीने व मे. कोर्टाचे शिक्यांनिशी दिली आहे.

**सही/-**
**लिपीक**
**दिवाणी न्यायाधिश 'व' स्तर, पनवेल**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश 'व' स्तर, पनवेल**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे आशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतीमधील भोगवटादार सदरी नमूद केलेल्या विद्यमान मालकांकडून त्यांचा अविभक्त हिस्सा कायमचा विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-गौरकामत, ता. कर्जत, जिल्हा-रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. | भोगवटादाराचे नाव |
|---|---|---|---|---|
| ९६ | ० | ३२-९८-०० | १२-३१ | १) अशोक श्रीराम देशमुख वगैरे १२<br>२) सुरेखा मनोहर देशमुख वगैरे ८<br>३) रत्नदिप सखाराम देशमुख वगैरे ४<br>४) अनंत गोविंद देशमुख<br>५) सुनंदा हनुमंतराव यशवंतराव |

सबब सदर जमीन मिळकतीचे संदर्भात टायटल संबंधाने कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास, गहाण, दान, लीन, अन्नवस्त्र, बॅकबोजा हक्क अधिकार, हितसंबंध, करारमदार, साठेखत, जनरल मुखत्यार अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर पुराव्यासह लेखी हरकत नोंदवावी. नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास उपरोक्त जमीन मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजण्यात येईल व आमचे अशिल विकसन करारनाम्याचा व्यवहार पुर्ण करतील. यांची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कर्जत
दि. १५/०७/२०२५

सही /-
**ॲड. नवनाथ कालिदास साळुंके**
ॲडव्होकेट आणि नोटरी
मु.ब्लॉक नं.२०६ विंग ४,
तुलसी आंगण सोसायटी,
ता. कर्जत, जि. रायगड.
पिन. ४१०२०१
फोन : ९८८१८४७०००

### सेवा दवाखाना अलिबागसाठी जागा भाड्याने घेणेबाबत

वैद्यकीय प्रशासन अधिकारी वागळे इस्टेट, मार्ग क्र. ३३, ठाणे ४०० ६०४ यांना सेवा दवाखान्यासाठी अलिबाग येथे जागा भाड्याने हवी आहे. निविदाचे अटी व शर्ती E-mail : http://bit.ly/3GLZiEV येथे उपलब्ध आहेत. उत्सुक व्यक्तींनी त्यांच्या परिपूर्ण निविदा दिलेल्या नमून्यामध्ये amoesisthane@gmail.com या मेलवर दिनांक २६/७/२०२५ पर्यंत संध्याकाळी ५ वाजेपर्यंत पाठवाव्यात.

Sign/-
Administrative Officer
A.M.O. Office MH-ESIS
Wagle Estate, Thane- 400 604

### जाहीर नोटीस

खालील नमूद मिळकतीबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करतो की, आमचे अशिल श्री अरविंद रामदास जैसवाल रा.मु.पो.चोंढी, ता.अलिबाग, जि.रायगड, मो. नं. ८८३०३१३०६३ यांचे सांगणेवरून खालील वर्णनाची मिळकती आहे. त्याबाबत नोटीस देतो की,

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मौजे | सर्व्हे नं/ हि नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १. | नवगावं ता.अलिबाग | ३६/३/व/२ | ०-०२-५० | ०.३७ |

आमचे अशिल श्री.अरविंद रामदास जैसवाल यांनी वरील मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रसाद वसंत राऊत, रा. बोरीस, पो. नवगावं, ता. अलिबाग, जि.रायगड, यांचे सोवत वर नमुद मिळकतीबाबत दिनांक १४/०९/२०२३ रोजी साठेकरार केलेला आहे. साठेकरार करतेवेळी वयाणा म्हणुन रक्कम रुपये ४,५०,०००/- (चार लाख पन्नास हजार मात्र) श्री. प्रसाद वसंत राऊत यांस अदा केलेले आहेत. सदर मिळकतीचे विद्यमान मालक आमचे अशिलांची फसवणुक करून सदरची मिळकत बेकायदेशीर रित्या अन्य इसमांस विकण्याचा प्रयत्न करत आहेत असे आमचे अशिलांस खात्रीलायक माहीती मिळालेली आहे. तरी प्रसाद वसंत राऊत यांचेसोबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. व तसा व्यवहार केल्यास त्या इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. यांची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख:- १४/०७/२०२५

सही/-
**(ॲड. सुरज रमेश म्हात्रे )**
अलिबाग-रायगड
९६३७६६५९५७

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग
### जाहीर नोटीस

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग, शाखा-पनवेल यांचे खालील नमूद लॉकर धारक यांनी १० वर्षांवरील कालावधीमध्ये लॉकर्सचे कोणतेही व्यवहार केले नसल्याने व सदर लॉकर्सचे भाडे थकीत असल्याने बँकेने सदर लॉकर्सचे पंचनामे करून ब्रेक ओपन करण्याचा निर्णय घेतला आहे व सदर लॉकर्स संबंधित खातेदारांनी ओपन करणेबाबत बँकेने दिनांक ३०.०८.२०२३ व दिनांक २२.०३.२०२४ रोजीचे रजिस्टर्ड नोटीसने संबंधित खातेदारांना कळविले आहे.

| अ.नं. | लॉकर धारकाचे नांव व पत्ता | लॉकर नंबर |
|---|---|---|
| १ | शेरबाणू आर धारणी-समर्थनगर बालुमिया चाळ, पाडा मोहल्ला, पनवेल | ४१ |
| २ | अनिल हरिभाऊ शिंदे-सिद्धांत मार्केट, पनवेल | ४० |
| ३ | पुरूषोत्तम जगन्नाथ गोडबोले-भागीरथी अपार्टमेंट, एमसीसीएच सोसायटी, पनवेल | ४४ |
| ४ | विजयाप्रभा मधुकर देशमुख-जानकी निवास, प्लॉट नं.३, सेक्टर-१९, नवीन-पनवेल. | ४९ |
| ५ | संजीव अनंत जठार-एमसीसीएच सोसायटी, प्लॉट नं.१२, पनवेल | ५१ |

आपणांस या नोटीसीद्वारे सूचित करण्यांत येते की, सदर कार्यवाहीबाबत आपल्या काही हरकती असल्यास आपण लेखी पत्राद्वारे आपले म्हणणे दिनांक २५.०७.२०२५ पर्यंत प्रत्यक्ष सादर करावे व लॉकर्स ब्रेक ओपन करणेचे दिवशी आपण स्वतः उपस्थित राहणे गरजेचे आहे. असे न केल्यास ब्रेक ओपन प्रक्रियेत आपली कोणतीही हरकत नाही असे समजून आपले वरील नावाने असलेले लॉकर्सचे दिनांक ३०.०७.२०२५ रोजी ब्रेक ओपन करण्यांत येतील व त्यामध्ये असलेला ऐवज पंचनामा करून बँकेच्या ताब्यात ठेवला जाईल.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १५.०७.२०२५

**शाखाव्यवस्थापक**
**पनवेल शाखा**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे खालापुर ता.खालापुर जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलानी तिचे विद्यमान मालक १) पी.मजीद आदम कुट्टी २) पी.जुबेदा आदम कुट्टी ३) शाबीदा महम्मद शाहीद ४ ) रियाज ए.पी. इब्राहीम कुट्टी ५) नुरजहा ए.पी.इब्राहीम कुट्टी ६) साईनना ए.पी. ७) सरीना ए.पी. ८) नसीमा अब्दुल सत्तार ९) आसिफ ए.पी. १०) साहीर ए.पी. ११) अब्दुल सलीम ए.पी. १२) सजिथ ए.पी. यांचा अविभक्त हिस्साची जागा खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| स. नं. | हि. न. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ३६ | ५अ | ०.६१.६० पैकी अविभक्त हिस्सा | ३. १० |
| ३६ | २ | ०.७४.७० पैकी अविभक्त हिस्सा | ३.६३ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही करार विक्री गहाण दान भाडेट्टा बक्षिस वारस हक्क पोटगी लीन चार्ज ताबा वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : १४/०७/२०२५

**ॲड. प्रदिप मोतीराम सुर्वे**
ए २०२ स्वप्ननगरी को.ऑप.हौ.
सोसायटी मुद्रे खुर्द. कर्जत रायगड
फोन. नं.२२०१२६/९८५०१३५६५९

### वार्षिक सर्वसाधारण सभा
### (फक्त सभासदांसाठी)

दत्ता पाटील अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेडची वार्षिक सर्वसाधारण सभा मे. चेअरमन साहेब यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दिनांक ३०/०७/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता दत्ता पाटील अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेड अलिबाग येथील कार्यालयात भरणार आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**सभेपुढील कामे**

१) मागील दि. ३०/०७/२०२४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणे व मान्यता देणे.
२) सन २०२४-२०२५ चे वैधानिक लेखापरिक्षण झालेल्या ताळेबंद व नफा तोटा पत्रकावर चर्चा करणे व स्विकृत करणे.
३) सन २०२४-२५ चा वैधानिक लेखापरिक्षकांचा लेखापरिक्षण अहवाल वाचन करणे.
४) कायदा व नियम यास अनुसरून संचालक मंडळाने सूचविलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
५) सन २०२३-२४ च्या दोष दुरूस्ती अहवालास मंजुरी देणे.
६) सन २०२५-२६ सालाकरीता लेखापरीक्षकांचा लेखापरीक्षण कामी नेमणूक करणे व त्यांचे मानधनास मान्यता देणे.
७) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
८) पुढील वर्ष सन २०२५-२६ सालाकरीता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
९) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

अलिबाग
दिनांक : १४/०७/२०२५

आपला विश्वासू

**श्री. प्रमोद दत्तात्रेय पाटील**
**(चेअरमन)**

**टिप- सदर सभा कोरम अभावी तहकुब झाल्यास ती त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरविण्यात येईल. यासभेस कोरमची आवश्यकता लागणार नाही.**

### जाहीर निविदा

**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**
**ता. माणगाव, जि. रायगड**

दिनांक १४/७/२०२५

**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे, ता. माणगाव, जि. रायगड**
**१५ वा वित्त आयोग अंतर्गत विकास कामांची व साहित्यांची निविदा खालीलप्रमाणे**

| अ. क्र. | कामाचे नाव/ साहित्याचे नाव | प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | ग्रा.प. कडे निविदा सादर करणेचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | कामाची मुदत | योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | निवी स्मशानभूमी शेड बांधणे | ४ लाख | २००/- | ४०००/- | २२/७/२०२५ सायं ०५:०० वा | २३/७/२०२५ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | जनसुविधा विशेष अनुदाने (२५१५१३८१) |
| २ | उमरोली-दिवाळी येथील मंगेश दळवी ते अशोक दळवी यांचे घरापर्यंत गटार बांधणे | ५१,२३५/- | २००/- | ५१२/- | २२/७/२०२५ सायं ०५:०० वा | २३/७/२०२५ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५ वा वित्त आयोग |
| ३ | ग्रामपंचायत क्षेत्रात निर्जंतुकीकरण करीता स्प्रेइंग मशीन खरेदी करणे | ७०,०००/- | २००/- | - | २२/७/२०२५ सायं ०५:०० वा | २३/७/२०२५ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५ वा वित्त आयोग |
| ४ | ग्रामपंचायत क्षेत्रात मागासवर्गीय वस्तीमध्ये स्वच्छतेविषयी साहित्य पुरविणे | ५०,०००/- | २००/- | - | २२/७/२०२५ सायं ०५:०० वा | २३/७/२०२५ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५ वा वित्त आयोग |
| ५ | ग्रामपंचायत हद्दीतील इतर कुटूंबांना स्वच्छतेविषयी साहित्य पुरविणे | ६७३१६/- | २००/- | - | २२/७/२०२५ सायं ०५:०० वा | २३/७/२०२५ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५ वा वित्त आयोग |
| ६ | ग्रामपंचायत कार्यालय दुरूस्ती करणे | १११८५३/- | २००/- | १११९/- | २२/७/२०२५ सायं ०५:०० वा | २३/७/२०२५ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५ वा वित्त आयोग |

**अटी व शर्ती :**
१.सदर निविदा बाबत अधिक माहिती ग्रामपंचायत मुठवली/तळे येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
२. निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली /तळे यांचा राहील. निविदा नामंजूर झाल्यास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
३. उपलब्ध निधीनुसार देयके आदा करणेत येईल.
४. निविदा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे, ता. माणगाव, जि. रायगड या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यात याव्यात.
५. देयकातून शासन निर्णयाप्रमाणे कपाती केल्या जातील.
६. अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा विचार ग्रामपंचायत करणार नाही.
७. ठेकेदारांनी वर्क आर्डर दिलेल्या तारखेपासून मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतेही कल्पना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

सही/-
**ग्रामसेवक**
ता. माणगाव, जि. रायगड
ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे

सही/-
**सरपंच**
ता. माणगाव, जि. रायगड
ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक

### महावितरण — जाहीर निवेदन

महापारेषण यांचे २२०/१००/२२ के.व्ही. कांदळगाव उप केंद्रातील २२ केव्ही बसचे देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यासाठी खालीलप्रमाणे माणगाव उप विभाग, रोहा विभाग, महावितरण यांचे २२ के.व्ही. वीजवाहिन्या बंद करण्यात येत आहे.

| अ. क्र. | २२ के.व्ही. वीजवाहिन्या बंद करण्यात येत आहे. | दिनांक | वेळ | प्रभावित होणारी गावे |
|---|---|---|---|---|
| १ | २२के.व्ही. माणगाव फीडर | १५.०७.२०२५ | ८:०० ते १७:०० | कसबेवाडी, घोटेवाडी, चनाट, हरवंडी, केळगणं, बोरवाडी, शिरसाड, चाच, माजुको, कुंभे , कामतवाडी, मळ्याची वाडी , धामणी , कातळाची वाडी , भारीदवाडी, हरवंडी कोंड , कोशिंबळे, निजामपूर, भाले, कुंभारते कोस्ते खु., कोस्ते बु, कोस्ते आदिवाडी, बागवाडी, फणसवाडी, माणगाव, उतेखोल, उतेखोलवाडी, खादाड , भादाव, नानोरे, मोरबा, साईव, मोजुरने, डोंगरोली, विहूले, विहूले आदिवासीवादी, उसर, उसर बु., विहूले कोंड, काकल, नाळेकोंडी, रानवडे, महादपोली, खारवली, साले, पळसगाव, पळसगाव खु., खरवली, रिले, सुरव, पाणेसे, बोरघर, आमडोशी, होडगाव, जोर घरोशी, जावळी, मुगवली, घरोशी आदिवासीवाडी, गांगवली, बांबवली, जांभूळवाडी , लोणशी, बोरघर, इंदापूर , दाखणे, कालवा , रुदोली, गंगेवाडी, पोटनेर, माकटी, उमरोली, दिवाळी, कोलाड, आंबेवाडी, पाले, संबे, वरसगाव, रानवाड, घोटवड, खांब, घाटाने, देवकाने, नडवली, अनव्हाळ, वैजनाथ,पुई, पुगाव, आदिवासीवाडी, चिंचवली, कोलाड आदिवासीवाडी, विंचवली, लोणशी मोहल्ला, वावे, गारळ, आडघर, उमरोली,चेरवली, लहाने सूरव, जाधव सूरव, राजीवली, बामणोली,मांगवली,कळमजे, साळवे, धालघर, करंबेली, खर्डी बु., खर्डी खु., चव्हाणवाडी, खरबाची वाडी, कात्याची वाडी, निलगुण, निवी, कालवण, कशेणे, पान्साई, वाढवण, कोल्हाण, नागरोली, वारक, विघवली, पाचोळे, मुठवली |
| २ | २२के.व्ही. धाटाव फीडर | | | |
| ३ | २२के.व्ही. कोलाड फीडर | | | |
| ४ | २२के.व्ही. कुडली फीडर | | | |
| ५ | २२के.व्ही. एमआयडीसी फीडर | | | |

अधिकमाहितीसाठी :– eeroha@mahadiscom.in, eeroha@rediffmail.com

सही/–
**कार्यकारी अभियंता, सं व सु. म.रा.वि.वि.कं.मर्या., विभाग रोहा**

PRO No. 211

## निवडक



### ई-रिक्षावर झाड कोसळले

**माथेरान :** माथेरानमध्ये सोमवार, दि.१४ रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास दस्तुरी वरून गावात येणाऱ्या ई-रिक्षावर काळोखी या ठिकाणी झाड कोसळल्याने रिक्षाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, चालकासह तीन प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. सकाळी साडेसहा वाजता दस्तुरी येथून चालक प्रशांत गायकवाड हे तीन प्रवाशांना घेऊन निघाले होते, काळोखी याठिकाणी रिक्षा आली असता अचानक एक झाड त्यांच्या रिक्षावर पडले. यामध्ये गायकवाड यांसह तिघे प्रवाशी गंभीर जखमी झाल्याने त्यांना तातडीने येथील नगरपालिकेच्या दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सुदैवाने यामध्ये कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसली तरीसुद्धा ई-रिक्षाचे प्रचंड नुकसान झाले आहे. पावसाळ्यात झाडे उन्मळून पडण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. काही दिवसांपूर्वी अशाचप्रकारे ई-रिक्षा चार्जिंग स्टेशन येथे रिक्षावर झाड पडल्याने दोन ई-रिक्षांचे नुकसान झाले होते. या दोन्ही घटनेत सुदैवाने जीवितहानी झाली नाही; परंतु गाड्यांचे नुकसान झाले होते. या रिक्षा चालकांना आणि जखमी प्रवाशांना शासनाने तातडीची मदत द्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.




### द.ग. तटकरे तंत्रनिकेतनचा गौरव

**कोलाड :** रोहा तालुक्यातील श्रीमती गीता द. तटकरे तंत्रनिकेतन गोवे कोलाड या डिप्लोमा कॉलेजला जिल्हा कौशल विकास केंद्रामार्फत उत्कृष्ट केंद्र म्हणून प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

१५ जुलै जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग व जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र रायगड अलिबाग कार्यालयामार्फत २०२४-२५ शैक्षणिक वर्षात राबविण्यात आलेल्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास योजना कार्यान्वित करण्यासाठी पहिल्याच वर्षी मोलाचे योगदान देत असल्याने कोलाड येथील तटकरे तंत्रनिकेतन डिप्लोमा कॉलेजचा उत्कृष्ट केंद्र प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. या प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित करण्यासाठी विनायक पोटफोडे तसेच सर्व प्रशिक्षकांनी मेहनत घेतली. त्याबाबद्दल तटकरे चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त संदीप तटकरे, प्राचार्य विपुल मसाल, रजिस्ट्रार अजित तेलंगे, प्राचार्य हजारे यांनी सर्वांचे अभिनंदन केले.



### सूर्यकांत विरकर यांचा गौरव

**खांब :** रोहा तालुक्यातील खांब येथील प्रतिष्ठित नागरिक व सेवानिवृत्त अधिकारी म्हणून ओळख असणारे सूर्यकांत विरकर यांचा पुणे येथे विशेष सन्मान करण्यात आला आहे.

पुणे पत्रकार भवन येथे कृतिशील सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत दळवी, उपाध्यक्ष व्यंकटराव गायकवाड, कार्याध्यक्ष मनोहर पोकळे, सरचिटणीस टी.के. गुरव यांच्या हस्ते सूर्यकांत विरकर यांचे सेवाकाळातील कार्य व सेवानिवृत्तीनंतरचे कार्य या कार्याची विशेष दखल घेऊन रायगड जिल्ह्यातील मुख्य प्रवर्तक म्हणून त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला आहे. यावेळी रायगड जिल्ह्यातून त्यांच्यासमवेत सेवानिवृत्त शाखा अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग महाड प्रदीप घाणेकर, सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता जलसंधारण विभाग रमेश फेरवाणी, सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता जलसंपदा विभाग शशिकांत माने, सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता जलसंपदा विभाग बालाजी शिर्के, सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता जलसंपदा विभाग प्रशांत पाथरे, डॉ. प्रमोद विरकर, स्नेहा विरकर आदी उपस्थित होते.

# मैथिली गेली... सरकार झोपलं!

## विमान अपघाताला महिना उलटूनही एक रुपयाची मदत नाही

### शासनाच्या घोषणा हवेत विरल्या


**| उरण | प्रतिनिधी |**

तालुक्यातील तरुणी मैथिली पाटील हिचा अहमदाबाद विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. त्या काळजाला चिरणाऱ्या घटनेला आज महिना उलटून गेला आहे. अपघाताच्या दुसऱ्याच दिवशी मोठ्या थाटात विविध मंत्र्यांकडून व प्रशासनाकडून भरघोस मदतीच्या घोषणा करण्यात आल्या. ''ही आमची मुलगी आहे'', ''सरकार कुटुंबाच्या पाठीशी आहे'' असे भावनिक उद्गार व्यक्त होत, मदतीच्या घोषणा मोठ्या थाटात करण्यात आल्या. मात्र, त्या घटनेला आज एक महिना उलटूनही, मदतीचा एक रुपयाही तिच्या कुटुंबियांपर्यंत पोहोचलेला नाही.

मैथिलीच्या कुटुंबात तिचे आईवडील, दोन बहिणी आणि एक भाऊ आहे. मैथिली ही सर्वात मोठी मुलगी होती. मैथिलीचे वडील पनवेलजवळील ओएनजीसीमध्ये कामगार आहेत. वृद्ध वडिलांना नाईलाजाने मजुरी करावी लागत आहे, तर आई व आजी यांचे डोळे सरकारकडे आशेने लागले आहेत. शासनाच्या निष्क्रियतेमुळे हे कुटुंब मदतीपासून वंचित आहे.

मैथिलीच्या आईने हृदयद्रावक शब्दांत आपल्या व्यथा मांडल्या.





#### वल्गना मोठ्या, कृती मात्र शून्य

**या प्रकारामुळे लोकशाहीत नागरिकांच्या व्यथा ऐकल्या जातात, परंतु उपाययोजना वेळेवर होत नसल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. मैथिली पाटीलच्या कुटुंबाच्या दुःखावर केवळ कॅमेऱ्यात टिपलेली आसवे आणि बातम्यांतील वल्गना राहिल्या आहेत. कृती मात्र अद्यापही शून्य आहे.**

त्या म्हणाल्या, मैथिली आमचं सगळं काही होती. आम्ही तिच्यावरच अवलंबून होता. तिचे वडील मजूर आहेत. तिने शिक्षण पूर्ण केले की, आमची परिस्थिती सुधारेल, अशी आशा होती. पण, आता तीच या जगात न राहिल्याने सर्वकाही संपलं आहे.

> **कुटुंबाचा आधार असणारी मुलगी आज आम्ही गमावली आहे. वडील ठेकेदाराकडे मजुरीचे काम करतात. ते कामावर नाही गेले, तर आमचा उदरनिर्वाह चालणार कसा? दोन मुलांच्या भविष्याचा विचार करुन आम्हाला मैथिली गेल्याच्या पंधरा दिवसांनंतर कामावर जाणे परिस्थितीने भाग पाडले आहे. परंतु, सरकारला, त्यांच्या अधिकाऱ्यांना कोणतेच सोयरसुतक नाही. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत आपल्या मुलीने काहीतरी मोठं करुन दाखवावं, हीच आमची आशा होती. पण, आज आमचं सर्वस्व हिरावलं आहे. – प्रमिला पाटील, मैथिलीची आई**

#### संवेदनशीलता हरपलेले नेते

**संवेदनशील हरपलेले नेते प्रशासनाच्या आणि लोकप्रतिनिधींच्या सांत्वनाच्या भेटी, फोटोसेशन आणि टीव्हीवर प्रसिद्धीसाठी देण्यात आलेली आश्वासने यापलीकडे प्रत्यक्ष मदतीसाठी कोणतेही ठोस पाऊल उचलले गेलेले नाही. भावनिक आश्वासनांची उजळणी झाली, पण त्यांची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात मदतीच्या घोषणा म्हणजे एक ढोंगी स्वप्न ठरलं आहे, आणि लोकशाहीची संवेदनशीलता पुरती गढूळ झाली आहे, अशा तीव्र प्रतिक्रिया समस्त उरणकरांमधून उमटू लागल्या आहेत.**

अपघातानंतर शासकीय यंत्रणांकडून मदतीचे आश्वासन दिले गेले असले, तरी कोणतीही ठोस मदत मिळालेली नाही, अशी खंत मैथिलीच्या आईने व्यक्त केली. सरकारने जर आमचं दुःख समजून घेतलं असतं, तर आज कुणीतरी पाठीशी उभं राहिलं असते, असे सांगताना मैथिलीच्या आईला अश्रू अनावर झाले.

# चिमुकलीला हवाय मदतीचा हात

### उरणच्या जेनिशाला गंभीर आजारानं ग्रासलं

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील बोकडविरा येथील प्रथमेश पाटील यांना आर्थिक मदतीची गरज आहे. त्यांच्या अडीच वर्षांच्या लेकीला SMA (spinal muscular atrophy type -3) या गंभीर आजाराने ग्रासले आहे. लेकीवर उपचार करण्यासाठी पाच कोटी रुपये खर्च येणार असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. मात्र, घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने इतका पैसा आणणार कुठून असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. लेकीचे प्राण वाचावे यासाठी धडपडणाऱ्या आई-वडिलांना आर्थिक मदतीचा हात हवा आहे.

जेनिशा प्रथमेश पाटील (२ वर्षे, ४ महिने) हिला SMA (spinal muscular atrophy type -3) या गंभीर आजाराने ग्रासले आहे. सध्या तिच्यावर वाडीया चिल्ड्रेन हॉस्पिटल परळ तसेच नायर हॉस्पिटल मुंबई सेंट्रल या शासकीय रुणालयात उपचार सुरु आहेत.

हॉस्पिटलने जेनिशच्या गंभीर आजार असलेल्या एस.एम.ए या आजाराचे निदान करण्यासाठी ५ कोटी खर्च येणार असल्याचे सांगितले आहे. जेनिशा हिच्या घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे.

एसएमए-३ हा एक दुर्मिळ आजार आहे. याच्यावर वेळीच



उपचार न केल्यास हा आजार मुलीचे सर्वच अवयव हळूहळू निकामी करू शकतो. हा आजार झालेली व्यकी कालांतराने आपली हालचाल बंद करतो. जेवणही कायमचे बंद करतो. अशा या गंभीर रोगाचे वेळीच इलाज करणे गरजेचे आहे, असे डॉ. शिल्पा कुलकर्णी नुरोलॉजिस्ट वाडिया हॉस्पिटल परळ मुंबई तसेच डॉ. अल्पना कोंडेकर नायर हॉस्पिटल मुंबई यांनी सांगितले आहे.

सर्वांनी आपापल्या परीने खारीचा वाटा उचलत सढळ हाताने आर्थिक मदत केल्यास जेनिशाचे प्राण वाचू शकतात. एक चांगले पुण्य कर्म आपल्या हातून होऊ शकते. म्हणून ज्यांना ज्यांना आर्थिक मदत करायचे आहे, त्यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया अकाऊंट नंबर-३०५०९२६२९६६, IFSC कोड -SBIN0009832 या खात्यावर आर्थिक मदत पाठवू शकता.

## शोधूनही रस्ता सापडेना..!



● तक्क्यावरून पनवेल स्थानकात जाणाऱ्या रस्त्याची खड्ड्यांमुळे अक्षरशः चाळण झाली आहे. या खड्ड्यांमध्ये रस्ता कुठे शोधावा, अशी अवस्था रस्त्याची झालेय. काही महिन्यांपूर्वी या रस्त्याचे पालिकेकडून डांबरीकरण करण्यात आले आहे. मात्र, रस्त्याकडे पाहिले असता, पावसात रस्त्यावर दाखवायलाही डांबरही शिल्लक राहिलेली नाही. पालिकेच्या उत्कृष्ट कामाचा हाच का तो नमुना, असे खेदाने म्हणावेसे वाटते. वाहनाचालकांना, विशेषतः दुचाकीस्वारांना मोठी कसरत करावी लागत असून, अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. (छायाचित्र : राजेश डांगळे)

# खांडा पूल २९ जूनपासून वाहतुकीस बंद

### सार्वजनिक बांधकाम विभाग सुस्त

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर नेरळ गावाच्या हद्दीत असलेल्या खांडा येथील लहान पूल २९ जूनपासून वाहतुकीस बंद केला आहे. हा पूल बंद झाल्यानंतर बाजूच्या पुलावरून वाहतूक सुरु आहे. मात्र, मोठी वाहने आल्यावर वाहनांची कोंडी होत असते. मात्र, मागील १५ दिवसांत त्या पुलाच्या दुरुस्तीबद्दल सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नसल्याने त्या ठिकाणी वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे. दरम्यान, बांधकाम विभागाने त्या पुलाच्या दुरुस्तीसाठी कोणत्याही प्रकारच्या कामाला सुरुवात केलेली नाही, त्यामुळे वाहतूक कोंडी ही समस्या कायमची राहणार आहे.

खांडा येथे लहान उंचीचा पूल असून, माथेरान डोंगरातून वाहून




येणारे पाणी कोतवाल वाडी भागातून या ठिकाणी येते आणि वाहत जाते. खचला असल्याची माहिती मिळाल्यानंतर २९ जूनपासून हा रस्ता वाहतुकीस बंद आहे. तेव्हापासून बाजूच्या पुलावरून वाहतूक केली जात असून, तो पूल अरुंद असल्याने मोठे वाहन आल्यावर एकाच वाहन तेथून जाते. त्या ठिकाणी लहान पुलाच्या बाजूला एमएमआरडीएने नवीन पूल बांधला होता. तेथून जाणारा दुहेरी रस्ता पूर्ण झाला नसल्याने नवीन पूल वाहतुकीस वापरला जात नव्हता. आता या पुलावरूनच वाहतूक सुरु आहे. मात्र, तो पूल दोन वाहनांसाठी योग्य नसल्याने वाहतूक कोंडी ही मोठी संशय बनली आहे. त्यामुळे नादुरुस्त पुलाची डागडुगी तसेच नवीन पुलाचे बांधकाम याबद्दल कोणतीही हालचाल होताना दिसत नाही.

## न्हावे येथील महिला बेपत्ता

**| चणेरा | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यात चणेरा विभातील न्हावे येथील वेदिका चंद्रकांत धोदे (३३) या दि. ६ जुलै रोजी सकाळी पाचच्या सुमारास घरात कोणाला काहीही न सांगता निघून गेल्या आहेत. याबाबत पती चंद्रकांत नाग्या धोदे (३७) यांनी रोहा पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. सडपातळ बांधा, सावळा रंग, काळे केस, साधारण १५२ सेमी उंची, अंगावर नेसलेली पिवळ्या रंगाची त्यावर हिरव्या रंगाची किनार असलेली साडी, पायात चप्पल असे त्यांचे वर्णन आहे. पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार मंगल टेमकर पुढील तपास करीत आहेत.

# पालकमंत्रीपदाबाबत निर्णय व्हावा

### खा. सुनील तटकरे यांचे मत

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

पालकमंत्रीपद हे घटनेने निर्माण केले आहे. जिल्ह्यात पालकमंत्री असणे आवश्यक आहे. लवकरच हा निर्णय झाला पाहिजे, असे मत खासदार तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी व्यक्त केले.

रायगडचे पालकमंत्रीपद गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे. शिंदे गट शिवसेना आणि अजित पवार गट राष्ट्रवादीमध्ये या पदावरून रस्सीखेच सुरू आहे. पालकमंत्री पदावरून एकमेकांविरोधात आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. शिवसेना शिंदे गटाचे भरत गोगावले यांनाच पालकमंत्रीपद मिळावे म्हणून स्वतः रोजगारहमी मंत्री भरत गोगावले, आ. महेंद्र दळवी, आ. महेंद्र थोरवे हे तिघेजण तटस्थ भूमिकेत आहेत.

#### काँग्रेस कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**अलिबाग तालुक्यातील बेलोशी आणि मानतर्फे झिराड येथील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला आहे. खा. सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश सोहळा सोमवारी राष्ट्रवादी भवनमधील सभागृहात पार पडला. बेलोशी विभागातील काँग्रेसचे नेते, अलिबाग पंचायत समितीचे माजी सदस्य श्रीधर भोपी, बेलोशीच्या माजी सरपंच कविता पाटील, भाविका गावंड, उज्ज्वला सांदणकर, गीतांजली पारंगे, वर्षा काटले, प्रचिती पाटील, गिरीश पाटील, रामचंद्र पारंगे, संदीप भोईर, प्रशांत काटले, नंदकुमार काटले, सतीश पाडगे, सुधीर शिर्के, सुरेश पाटील, अनंत लोहार, लक्ष्मण शेळके, सुनील भोईर, शुभम पाटील, उदय सांदणकर आदींसह मानतर्फे झिराडमधील उपसरपंच राकेश पाटील, दर्शन म्हात्रे, प्रसाद नाईक, बंडू घरत, अंकिता भगत यांनी राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला.**

आमचे आमदार जास्त असल्याने शिवसेनेलाच पालकमंत्रीपद मिळावे म्हणून राष्ट्रवादीला आव्हान देत आहेत. जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून राजकारण तापले आहे. त्याचा परिणाम जिल्ह्यातील विकासावर होत असल्याची चर्चा जोरात सुरू आहे. जिल्ह्याला पालकमंत्री नसल्याने जिल्हा नियोजन समितीच्या बैठकाही रखडल्या आहेत. जिल्हा नियोजन समितीचा निधीही वितरीत करण्याचा अधिकार राज्य पातळीवर राहणार आहे. त्यामुळे हा वाद अधिकच विकोपाला



गेला असल्याचे चित्र आहे.

पालकमंत्रीपदावरून सोमवारी तटकरे यांना विचारणा केली असता, पालकमंत्रीपद हे घटनेने निर्माण केले आहे. जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष म्हणून पालकमंत्री यांची महत्त्वाची भूमिका असते. पालकमंत्रीपद कोणाला द्यायचे, हे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री ठरवतील. यावर लवकरच निर्णय झाला पाहिजे, असे मत खा. तटकरे यांनी व्यक्त केले. त्यामुळे सरकार काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

जिल्ह्यात आदिती तटकरे यांना पालकमंत्रीपद मिळू नये, म्हणून शिंदे गटातील तिन्ही नेते जिवाची बाजी लावत आहेत. हे पद भरत गोगावले यांना मिळावे, यासाठी शिंदे गटातील आमदारही शर्थीचे प्रयत्न करीत आहेत. परंतु, कोणाच्या गळ्यात पालकमंत्रीपदाची माळ पडेल, हे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या निर्णयानंतरठरणारआहे.सद्यःस्थितीत रायगडच्या पालकमंत्रीपदाचा वाद शिगेला पोहोचला असून, राष्ट्रवादी आणि शिवसेना शिंदे गटात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडण्यात येत असल्याचे दिसून येत आहे.

### संकष्टी चतुर्थीनिमित्त भाविकांची गर्दी | बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टकडून चोख व्यवस्था

# पालीत भक्तांची मांदियाळी

**| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |**

अष्टविनायकांपैकी एक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीतील बल्लाळेश्वरच्या दर्शनासाठी संकष्टी चतुर्थीला भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पहाटेपासून बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या. यावेळी छोट्या-मोठ्या व्यावसायिकांचा धंदा तेजीत होता.

रायगड जिल्ह्यासह मुंबई, ठाणे, पुणे व राज्यातून पालीत हजारोंच्या संख्येत भाविक व त्यांची वाहने दाखल झाली होती. त्यामुळे वाहतूक कोंडीदेखील झाली होती. भाविकांची मोठी गर्दी असल्याने येथील दुकानदार व हॉटेल व्यावसायिकांचा धंदादेखील तेजीत होता. परिसरातील दुकाने, हॉटेल व लॉज ग्राहकांनी गजबजले होते. येथील हॉटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तुंची दुकाने, नारळ, हार, फुले व पापड, मिरगुंड, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले सुखावले होते. मंदिर परिसरात मोठी वर्दळ होती. देवळात येणारे भाविक आवर्जून येथून रानभाज्या खरेदी करताना दिसले. त्यामुळे





● (छायाचित्र : भूषण सुतार)

> **सोमवारी संकष्टी चतुर्थीला मोठ्या प्रमाणात भाविक बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी आले होते. भाविकांची वर्दळ असल्याने व्यवसायदेखील चांगला झाला. – नरेश बैकर, व्यावसायिक, बल्लाळेश्वर देवस्थान**

> **देवस्थान ट्रस्टने भाविकांसाठी दोन भक्त निवास नाममात्र दरात उपलब्ध केले आहेत. वाहने पार्क करण्यासाठी देवस्थानची दोन भव्य मोफत पार्किंगदेखील आहे. प्रसादालय खुले आहे. त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे. – जितेंद्र गद्रे, अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली**

या विक्रेत्यांचा धंदासुद्धा चांगला झाला. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

# अंकिता संजय शेठ सीए परीक्षेत उत्तीर्ण

**| रोहा | प्रतिनिधी |**

रोह्यातील बंगळे आळी येथील रविवासी संजय शेठ यांची कन्या अंकिता हिने इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंट्न्स ऑफ इंडिया (आयसीएआय) मार्फत घेतली जाणारी राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेची समजली जाणारी चार्टर्ड अकाऊंटन्ट (सीए) परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे.



अंकिता हिने सातत्यपूर्ण परिश्रम, प्रबळ आत्मविश्वास आणि आई कै. सायली तसेच आई सीमा, वडील संजय, आजी वनिता मदन शेठ, तसेच दादा-वहिनी यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे हे यश संपादन केले. तिच्या या यशाबद्दल नातेवाईक, मित्रपरिवार, शिक्षकवृंद तसेच रोहा शहरातील नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. रोह्यातील केईएस मेहेंदळे हायस्कूलमध्ये दहावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर अंकिता हिने जे.एम. राठी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये ज्युनियर कॉलेजचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर पुणे येथील एस.पी. कॉलेजमध्ये बीबीए शिक्षण पूर्ण करुन सीएच्या परीक्षेत देदीप्यमान कामगिरी बजावली आहे. पुढे आर्थिक क्षेत्रात काम करत समाजाच्या प्रगतीसाठी मोलाचा वाटा उचलण्याचा संकल्प अंकित शेठ हिने केला आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# खडखडाटाचा आवाज

राज्य सरकारच्या तिजोरीत खडखडाट आहे. आणि हा खडखडाटाचा आवाज विरोधक नव्हे तर, दादांच्या राष्ट्रवादीचे आमदार व मंत्रीच काढत आहेत. अजितदादांकडेच अर्थखाते आहे. पण त्यांचेच जिल्हाबंधू व मंत्री दत्तात्रय भरणे यांनी शनिवारी इंदापुरात बोलताना विकास कामांसाठी निधी उशिरा मिळत असल्याची तक्रार केली. यामागचे खरे कारणही त्यांनी सांगून टाकले. लाडक्या बहिणींसाठी तरतूद करायची असल्याने पैसे वेळेवर मिळत नाहीत असे ते म्हणाले. नंतर याबाबत छगन भुजबळ यांना विचारले असता त्यांनीही हेच सांगितले. लाडकी बहीण योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर ताण आला आहे हे खरे आहे असे ते म्हणाले. अजितदादा मात्र अजूनही हे सर्व नाकारण्याच्या भूमिकेत आहेत. भरणे यांना कुठे निधी कमी पडला हे मी जाणून घेईन असे ते म्हणाले. एका अर्थाने ही दमबाजी आहे. भरणे यांनी यापुढे तोंड उघडू नये असा हा इशारा आहे. तरी बरे, भरणे हे दादांच्या मर्जीतले मंत्री आहेत. लाडकी बहीण योजनेने सरकारचे दिवाळे वाजले आहे हे उघड आहे. सरकार मात्र ते कबूल करायला तयार नाही. अलिकडेच दारु दुकानांचे नवीन परवाने देऊन राज्याचा महसूल वाढवण्याच्या एका प्रस्तावाची चर्चा होती. राज्यात १९७४ पासून दारुचे नवीन परवाने देणे बंद आहे. तेव्हा मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर इत्यादींनी दारु परवान्यांविरुध्द आंदोलन केल्याने ते बंद करण्यात आले. त्याआधी देण्यात आलेल्या दुकानांचेच परवाने इकडून तिकडे फिरत असतात. १९७४ पूर्वी दिलेले परदेशी बनावटीच्या दारुविक्रीचे १७०० आणि देशी दारुविक्रीचे साडेतीन हजार परवाने आहेत. हे परवाने हस्तांतरीत करता येतात व त्यासाठी त्यांना सोन्याच्या वरताण भावाने पैसे मोजले जातात हे उघड गुपित आहे. त्यामुळेच आता सुमारे सव्वातीनशे नवीन दारु विक्री परवाने देण्याचा सरकार विचार करीत असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. अजितदादांनी त्याचाही इन्कार केला असला तरी त्याबाबतचा संशय पुरता फिटलेला नाही. यामध्ये दादांचा मुलगा जय यांच्या बारामतीच्या कंपनीला फायदा होईल असे धोरण आखले गेल्याच्याही बातम्या आहेत. दादांनी अर्थातच त्याचाही इन्कार केला आहे.

## दारु विकण्याचे इरादे

मद्यविक्रीचे परवाने ज्या अंतर्गत येतात त्या अबकारी खात्याकडून राज्याला सध्या ४३ हजार कोटी रुपये महसूल मिळतो. नवीन दुकाने उघडायला परवानगी दिली तर त्यातून दरवर्षी आणखी १४ हजार कोटी रुपये मिळतील असा अंदाज आहे. शिवाय हा जीएसटीचा भाग नसल्याने हा करमहसूल पूर्णपणे राज्यालाच वापरायला मिळेल. सध्या लाडकी बहीणसाठी तरतूद कुठून व कशी करायची याने अधिकारी इतके त्रस्त झाले आहेत की दर महिन्याला अशा नवनवीन योजना काढल्या जात आहेत. यंदा अधिवेशनात भाजपचे आमदार राम कदम यांनी लाडक्या बहिणींचे पैसे गेल्या चार महिन्यात मिळालेलेच नाहीत अशी टीका केली होती. त्याला इतर आमदारांनी पाठिंबा दिला होता. त्यामुळे जनतेमधून पैसे मिळत नसल्याची नाराजी व खदखद आहे. तर इकडे राज्य सरकारमध्ये पैसे आणणार कुठून म्हणून डोक्याला हात लावून बसायची पाळी आहे. त्यातूनच मग आता पैसे संपले तर दारु विकूया असा पर्याय पुढे आलेला दिसतो. सध्या दादांनी याचा इन्कार केला असला तरी आज ना उद्या यातले सत्य बाहेर येईलच. विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजना आणली. तिला आधी फडणवीस फार अनुकूल नव्हते असे म्हणतात. अजितदादाही साशंक होते. अर्थ खात्याने काही विरोधी शेरे नोंदवले होते. पण शेवटी योजना आली. सगळेजण भाऊ म्हणून मिरवले आणि आता तीच योजना यांच्या आणि राज्याच्या गळ्याचा फास बनू लागली आहे. इतके असूनही सत्य सांगण्याची हिंमत या तिघांपैकी कोणामध्येही नाही. त्यामुळे परिस्थिती रेटून नेणे चालले आहे. याचा कधी ना कधी स्फोट होण्याची शक्यता आहे. योजनेचा फायदा हजारो अपात्र महिलांनी घेतला. त्यात अगदी राज्य सरकारमध्ये नोकरी करणाऱ्या बायकाही सामील होत्या. त्यांनी शेकडो कोटी रुपये बेकायदेशीरपणे घेतले. पण सरकारने त्यांच्यावर कारवाई करण्याचे सोडाच, पण त्यांच्याकडून ते वसूल करण्यासाठीही कोणतीही पावले उचललेली नाहीत.

## जनसुरक्षा कायदा याचसाठी

या योजनेत अगदी आजही अनेक अशाच अपात्र पण लाभ घेणाऱ्या महिला असण्याची भरपूर शक्यता आहे. ग्रामीण भागात शेतकरी आणि शहरी भागातील खासगी नोकऱ्या वा व्यवसाय करणाऱ्या महिलांचा त्यात समावेश असेल. पण या महिलांचे पैसे थांबवण्याची हिंमत सरकारपाशी नाही. त्यातून आता तर पुन्हा मुंबई व इतर पालिकांच्या तसेच जिल्हा परिषदांच्या निवडणुका येऊ घातल्या आहेत. त्यामुळे या संभाव्य मतदारांना दुखावायचे नाही असेच सत्तेच्या रिक्षेच्या तिघा ड्रायव्हरांचे मत असणार. त्यामुळे आणखी किमान वर्षभर तरी हे दुखणे घेऊनच राज्याला वाटचाल करावी लागणार आहे. हे असेच चालू राहिले तर सरकार कर्मचाऱ्यांचे पगार करायलाही पैसे शिल्लक राहणार नाहीत. याच दरम्यान राज्य सरकारमध्ये सुमारे तीन लाख पदे रिक्त असल्याची बातमी आली आहे. सरकारने सर्व खात्यात मिळून मंजूर केलेल्या सात लाखांपैकी तब्बल तीन लाख म्हणजे सुमारे चाळीस टक्के पदे रिक्त असतील तर आपला कारभार कसा चालला असेल हे लक्षात यावे. आरोग्य, शिक्षण, पोलिस, बांधकाम अशा सर्वच खात्यांमध्ये माणसांची चणचण आहे. पण सरकारकडे नवीन माणसे घ्यायला पैसेच नाहीत. आश्वासने मात्र दे दणादण चालू आहेत. गेल्या दोन वर्षांच्या काळात वेगवेगळ्या जातींसाठी पन्नास महामंडळे काढण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे. या महामंडळांना किमान एक कार्यालय व खुर्ची टेबल द्यायचे म्हटले तरी सरकारकडे पैशांची बोंब असेल. प्रत्येक जातीला एकेक महामंडळ देण्याचे गाजर दाखवून त्यांची मते खिशात टाकून झाली आहेत. आता पुढच्या निवडणुकीपर्यंत त्याकडे पाहण्याची गरज नाही अशी बहुदा सरकारची भूमिका असावी. याच रीतीने कितीतरी मोठ्या लोकांची स्मारके करण्याच्या घोषणा अलिकडे वारंवार केली जाते. हे सगळे करण्यासाठी सरकार पैसे कुठून आणणार हा प्रश्न कोणालाही पडत नाही. अर्थात, याविरुध्दचा असंतोष हळूहळू बाहेर पडणार आहेच. याचीच कल्पना असल्याने बहुदा सरकारने आंदोलनांवर बंदी घालणारा जनसुरक्षा कायदा केला आहे. एखादी संघटना नकोशी झाली की तिला बेकायदा ठरवायचे आणि तिच्या नेत्यांना तुरुंगात टाकायचे असा सरकारचा इरादा आहे. त्याला या कायद्याचा आधार मिळणार आहे. आपल्या धोरणांविरुध् बोलणाऱ्या कोणत्याही लोकांना कडवे डावे असे म्हटले की त्यांना बेकायदा ठरवायचा मार्ग या कायद्याने मोकळा होणार आहे. आपली आर्थिक दिवाळखोरी लपवण्यासाठीच हा सगळा बंदोबस्त लावण्यात आला आहे.

विचार

# नेतृत्वबदलाचा पेच मिटला, संघर्ष कायम

***कर्नाटकमध्ये मागच्या वेळी समन्वय नसल्याने काँग्रेसची सत्ता गेली. आताही येथे काँग्रेस सत्तेत येऊन दोन वर्षे झाली असताना नेतृत्वबदलाच्या मागणीने जोर धरला होता. येथे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांचा गट अडीच वर्षांच्या तडजोडीकडे लक्ष वेधत आहे. पण पक्ष सिद्धरामय्या यांना बदलणार नाही. यामुळे पक्षांतर्गत संघर्ष निर्माण राहून मध्य प्रदेश किंवा राजस्थानसारखी परिस्थिती निर्माण होऊ शकते.***




श्रीनिवास राव

कर्नाटकच्या सिद्धरामय्या सरकारमध्ये सर्व काही ठीक नाही. उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार आणि मुख्यमंत्र्यांच्या गटांनी नेतृत्वबदलाचे दावे करण्यास अलिकडेच सुरुवात केली. याशिवाय काही नेते आपल्याच सरकारला घेरण्याचा प्रयत्न करत आहेत. काहींनी भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत, तर काहींनी विकासावरून आरोप करत माध्यमांसमोर विधाने केली आहेत. त्यामुळे पक्षांतर्गत राजकीय संघर्ष जनतेसमोर आला आहे. काँग्रेसचे सरचिटणीस रणदीप सुरजेवाला यांनी निरिक्षक म्हणून बंगळुरूला येऊन आमदार आणि नेत्यांशी या विषयावर व्यक्तिशः चर्चा केली. त्यांनी ही बैठक नेतृत्वबदलासाठी नसल्याचे सांगितले असले, तरी प्रत्यक्षात ते त्यासाठीच आले होते, हे सर्वज्ञात आहे. आपले निरीक्षण आणि नेतृत्वबदलाबाबत काय केले पाहिजे, याचा अहवाल ते पक्षश्रेष्ठींना देतीलच; परंतु सरकारमधील राजकीय गोंधळ त्यांना कितपत समजला असेल, याबद्दल शंकाच आहे. त्याचे कारण त्यांनीही नेतृत्वबदल होणार नसल्याचे सांगितले आहे. श्रेष्ठी राज्यात आले की नेते 'तुझ्या गळा, माझ्या गळा' करतात आणि त्यांची पाठ वळली, की 'धरू एकमेकांचा गळा' असे वागणे असते. सुरजेवाला यांना कर्नाटकमध्ये का यावे लागले, याचे चिंतन केले, तर खरे कारण लक्षात येते. गेल्या एका आठवड्यात पक्षांतर्गत अशी अनेक विधाने समोर आली, ज्यामुळे काँग्रेस सरकारच्याच अस्तित्त्वाचा प्रश्न निर्माण झाला. एकीकडे आमदार बी. आर. पाटील यांनी गृहनिर्माण विभागातील भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित केला, तर दुसरीकडे आमदार राजू कागे यांनी ढासळणाऱ्या प्रशासकीय व्यवस्थेचा मुद्दा उपस्थित केला.

याच सुमारास काँग्रेसचे आमदार इक्बाल हुसेन यांनी सत्ता परिवर्तनाचा मुद्दा उपस्थित केला. एका निवेदनात त्यांनी म्हटले होते की पक्षश्रेष्ठींच्या मनात काही तरी मोठे चालले आहे. सत्ता परिवर्तन होण्याची शक्यता आहे. इक्बाल हे डी. के. शिवकुमार यांचे समर्थक असल्याने त्यांना मुख्यमंत्री बनवण्याची कसरत त्यांनी सुरू केली आहे. काँग्रेस पक्षश्रेष्ठींसमोर अडीच वर्षांच्या फॉर्म्युल्यावर चर्चा झाली होती. त्यामुळे आता डी. के. शिवकुमार यांना मुख्यमंत्री करावे, अशी आठवण त्यांनी पक्षश्रेष्ठींना करून दिली होती; पण मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचे समर्थक अशा कोणत्याही फॉर्म्युल्याला नकार देत आहेत. दरम्यान, सिद्धरामय्या यांच्या चिरंजीवांना विश्वास आहे की ते पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करतील. नेतृत्वबदलाबाबत कर्नाटक काँग्रेसमध्ये सुरू असलेली सुंदोपसुंदी आणि परस्परविरोधी विधानांनी पक्षश्रेष्ठी नाराज झाले आहेत. त्यामुळेच तर त्यांनी सुरजेवाला यांना बंगळुरूला पाठवले. आता अशा सर्व नेत्यांना सुरजेवाला यांच्या माध्यमातून इशारा देण्यात आल्याचे समजते. सार्वजनिक ठिकाणी अशी विधाने करणे टाळण्याचा सल्ला त्यांना देण्यात आला असल्याचे सांगितले जात आहे. सुरजेवाला यांनी काही नेत्यांशी खासगीतही चर्चा केली. आमदारांना भेटण्याचा त्यांचा निर्णय पक्षश्रेष्ठींनी सिद्धरामय्या मंत्रिमंडळात संभाव्य फेरबदल किंवा अगदी नेतृत्व बदलाबद्दल आमदारांचे मन जाणून घेण्याचा प्रयत्न म्हणून नेतृत्वाच्या विविध गटांनी पाहिला. तथापि, काँग्रेस श्रेष्ठींनी नेतृत्वबदलाची शक्यता फेटाळून लावली.

सिद्धरामय्या या वर्षाच्या अखेरीस शिवकुमार यांना मुख्यमंत्री बनवतील, अशा अटकळींना पूर्णविराम मिळाला आहे. शिवकुमार गटातील आमदार गेल्या काही काळापासून दोघांमध्ये अडीच वर्षांचा कार्यकाळ वाटपाचा फॉर्म्युला अंमलात येण्याची शक्यता वर्तवत आहेत. सिद्धरामय्या गटाने अशा कोणत्याही कराराचे अस्तित्व नाकारले आहे. उलट, त्यांनी शिवकुमार यांच्या दोन पदे भूषवण्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. पक्षाच्या सूत्रांनी असेही सूचित केले आहे की सध्या नेतृत्वबदलाची चर्चाही केली जात नाही. सिद्धरामय्या गटातील सूत्रांना विश्वास आहे की ते पाच वर्षे मुख्यमंत्रीपदी राहतील. मुख्यमंत्र्यांच्या जवळच्या एका नेत्याने सांगितले, की ते काँग्रेसचे एकमेव मागासवर्गीय मुख्यमंत्री आहेत. श्रेष्ठींनी अलीकडेच पक्षाच्या सुमारे दोन डझन वरिष्ठ मागासवर्गीय नेत्यांचा समावेश असलेली ओबीसी सल्लागार परिषद स्थापन केली आहे. परिषदेची पहिली बैठक लवकरच बंगळुरूमध्ये होत आहे. बैठकीनंतर सिद्धरामय्या त्यांच्यासाठी जेवणाचे आयोजन करतील. अशा पार्श्वभूमीवर एका ओबीसी नेत्याला पक्षश्रेष्ठी कसे हटवू शकतात, असा सवाल केला जात आहे. काँग्रेस श्रेष्ठींमधील सूत्रांनी सांगितले की सुरजेवाला यांच्या भेटीचा उद्देश नेतृत्वातील एका गटात निर्माण झालेली निराशा दूर करणे हा होता. निधी वाटपाबाबत एक-दोन आमदारांनी उघडपणे आपली निराशा व्यक्त केली. दुसरीकडे, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या विधानांमुळे संमिश्र संकेत मिळाले होते. ते म्हणाले होते, 'हे हायकमांडच्या हातात आहे. हायकमांडच्या मनामध्ये काय चालले आहे हे कोणीही सांगू शकत नाही. ते हायकमांडवर सोपवले आहे आणि हायकमांडला पुढील कारवाई करण्याचा अधिकार आहे; परंतु कोणीही अनावश्यक समस्या निर्माण करू नये,'' राज्यातील काही काँग्रेस नेत्यांनी ऑक्टोबरमध्ये नेतृत्व बदलाच्या दाव्यांबाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना ते बोलत होते. सुरजेवाला यांच्या भेटीबद्दल विचारले असता खर्गे म्हणाले की, सुरजेवाला यांच्या अहवालाच्या आधारे आणि त्यांच्याकडून मिळालेल्या अभिप्रायाच्या आधारे आम्ही कोणती पावले उचलायची हे ठरवू. आता खर्गे यांच्या विधानाचा वेगवेगळा अर्थ लावला जात आहे. कर्नाटकमधील सत्ताधारी काँग्रेस दोन गटांमध्ये विभागली गेली आहे. एका गटाला सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्री म्हणून कायम ठेवण्याची इच्छा आहे तर दुसऱ्या गटाला शिवकुमार यांच्यासाठी मार्ग मोकळा होणे अपेक्षित आहे. शिवकुमार गटाच्या मते सरकारच्या कार्यकाळाच्या मध्यभागी नेतृत्वबदल करण्याबाबत करार झाला होता. अर्थात हा दावा मुख्यमंत्र्यांच्या गटाने फेटाळून लावला आहे. सप्टेंबरनंतर 'क्रांतिकारी' राजकीय घडामोडींचे संकेत देणाऱ्या सहकार मंत्री के. एन. राजन्ना यांच्या वक्तव्यानंतर बदलांबाबतच्या अटकळींना पुन्हा उधाण आले होते. अशा वेळी सुरजेवाला यांची भेट झाली आहे.

सिद्धरामय्या यांचे जवळचे सहकारी राजन्ना यांनी असेही संकेत दिले होते, की सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री सतीश जारकीहोळी हे शिवकुमार यांच्या जागी पुढील प्रदेशाध्यक्ष असतील. पक्षाच्या वर्तुळात मंत्रिमंडळात फेरबदलाचीही चर्चा आहे. कर्नाटकचे काँग्रेस आमदार एच. ए. इकबाल हुसेन यांनी दावा केला होता की शिवकुमार यांना पुढील दोन ते तीन महिन्यांमध्ये राज्याचे मुख्यमंत्री होण्याची संधी मिळू शकते. हे सरकार सत्तेत येण्यापूर्वी आमच्या (काँग्रेस) ताकदीची तुम्हाला सर्वांना माहिती आहे. हा विजय मिळवण्यासाठी कोणी संघर्ष केला, घाम गाळला आणि जोमदार प्रयत्न केले हे सर्वांना माहिती आहे. आम्हाला विश्वास आहे की पक्षश्रेष्ठींना परिस्थितीची जाणीव आहे आणि ते डी. शिवकुमार यांना संधी देण्यासाठी योग्य वेळी योग्य निर्णय घेतील. हुसेन यांनी सांगितले की २०२३ च्या विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेसश्रेष्ठींनी सरकार स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी आम्ही सर्वजण दिल्लीत एकत्र होतो. सोनिया गांधी, राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गे यांनी निर्णय घेतला. सर्वांना हे माहित आहे की पुढचा निर्णयही तेच घेतील. आपल्याला वाट पाहावी लागेल; मात्र नव्या घडामोडींनुसार त्यांच्या म्हणण्याला काहीही अर्थ नाही. पाच वर्षे आपणच मुख्यमंत्री राहू, असे सिद्धरामय्या यांनी ठामपणे सांगितले. सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांचे हातात हात घालून उंचावतानाचे छायाचित्र प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांनी सिद्धरामय्या हेच मुख्यमंत्री राहतील, आमच्यात कोणताही संघर्ष नाही, असे सांगितले; परंतु त्यांचे त्यापुढचे वाक्य जास्त महत्त्वाचे आहे. पक्षश्रेष्ठींचा तसा निर्णय असेल तर मी काय करणार, माझ्यापुढे काय पर्याय आहेत, अशी उलट विचारणा त्यांनी केली. मागे त्यांनी पक्षाच्या निर्णयाविरोधात घेतलेली भूमिका आणि शिवकुमार आणि शशी थरूर यांच्या भाजपच्या प्रवेशाच्या चर्चा पाहता ही वादळापूर्वीची शांतता आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो.

चर्चा आजची

# अंमली पदार्थांचा तरुणाईला धोका

प्रमोद जाधव

रायगड जिल्ह्यामध्ये डिझेल तस्करीसह चरस तस्करीचा धोका वाढू लागला आहे. वेगवेगळ्या भागात हे धंदे चालविले जात आहे. स्थानिकांकडून या धंद्याला दुजोरा दिला जात आहे.त्यामुळे तरुण पिढी बरबाद होण्याची भिती निर्माण झाली आहे. रायगड पोलीस दलाकडून या धंद्याविरोधात कारवाई सुरू करण्यात आली आहे. अनेकांना अटकही केली आहे. मात्र पालकांनीदेखील याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

रायगडच्या पोलीस अधीक्षक म्हणून आंचल दलाल यांनी सुत्रे हाती घेतल्याव जिल्ह्यातील अवैध धंदे बंद करण्याची मोहिम त्यांनी हाती घेतली. अवैध धंद्याना थारा देणाऱ्या तसेच चुकीचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून त्यांना दणका देण्याचे काम केले जात आहे. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली नाका बंदी चालू होती. ठिकठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी केली जात होती. रायगड पोलीस दलातील मुरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिघ्रे येथे तपासणी नाक्यावर पोलीस हवालदार हरी मेंगाळ नाकाबंदीला होते. २९ जूनला मध्यरात्री पावणे दोन वाजण्याच्या सुमारास गस्तीवर असताना समोरून एक स्कूटर आलेली दिसली. चालकाचे वाहन चालविण्यावरून पोलिसांना संशय आला. त्याचवेळी दुचाकी चालकाच्या मागे बसणारा एकजण चालत्या दुचाकीवरून उडी मारून तेथून पसार झाला. या प्रकारामुळे पोलिसांचा संशय अधिक बळावला. पोलिसांनी दुचाकी थांबवून चालकाची चौकशी केली. त्याच्या बोलण्यामध्ये गडबड गोंधळ निर्माण झाल्याचे दिसून आले. त्यामुळे गाडीची तपासणी केली. त्यावेळी गाडीमध्ये ७७६ ग्रॅम वजनाचा चरस नावाचा अंमली पदार्थाचा साठा सापडला. याप्रकरणी मुरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली तपास यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आली. मुरूड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख, पोलीस उपनिरीक्षक अविनाश पाटील, पोलीस हवालदार जनार्दन गदमले, हरि मेंगाळ, पोलीस नाईक किशोर बठारे, पोलीस शिपाई अतुल बारवे, विशाल पाटील यांच्यासह स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेतील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे पथक तयार करण्यात आले. दुचाकी चालक अलवान दफेदार याला ताब्यात घेऊन त्याची सखोल चौकशी सुरू करण्यात आली. चरस वितरण करण्यापासून वाहतूक करणे, वितरण करण्यासाठी देखरेखेवर असणारे अशा अनेक जणांची माहिती घेऊन त्यांना पकडण्यास सुरूवात केली. गेल्या १२ दिवसांमध्ये १३ जणांना अटक करण्यास या पथकाला यश आले असून त्यांच्याकडून दोन किलो ६५९ ग्रॅम वजनाचे १३ लाख ६१ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या गुन्ह्यात अलवान दफेदार, विशाल जैसवाल, अनुप जैसवाल, अनुज जैसवाल, अशिष डिगे, प्रणित शिगवण, आनस कबले, वेदांत पाटील, साहिल, नाडकर, अनिल पाटील, सुनील शेलार, राजू खोपटकर, खुबी भगेल या आरोपींचा समावेश आहे. १८ पासून २७ वर्षापर्यंतचे नऊ आरोपी आहेत. काशिद, मजगाव, पेठ मोहल्ला, गावदेवी पाखाडी, मुरूड, कल्याण, उत्तर प्रदेश येथील हे आरोपी आहेत.त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यातील मुरूड व काशिद हे पर्यटन स्थळ आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटक तसेच स्थानिक पर्यटक येतात. या पर्यटकांसह काही स्थानिकांना चरस विकण्याचा प्रकार चालविला जात होता. त्या परिसरातील घोडेवाले आणि आयस्क्री विक्रेत्यांच्या मदतीने चरसची विक्री, वाहतूक व वितरण सुरु होते. या गुन्ह्यातील विशाल जैसवाल हा आरोपी मुख्य वितरक असून नेपाळ आणि मध्यप्रदेशमधून चरस आणून ते या परिसरात विकत होते. अशिष डगे व प्रणित शिगवण या स्थानिकाच्या मदतीने चरस विकला जात होता. स्कूटरमधून चरसची वाहतूक करण्यात आली होती. ती स्कूटर पोलिसांनी जप्त केली. स्कूटरची माहिती घेतल्यावर ती स्कूटर चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. जिल्ह्यामध्ये चरससह गांजा सारख्या अंमली पदार्थांची तस्करीदेखील मोठ्या प्रमाणात केली जाते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना हे विष दिले जाते. त्यामुळे तरुण पिढी या चरस गांजा सारख्या नशा देणाऱ्या पदार्थांच्या आहारी जाण्याची भिती वाढली आहे. रायगड पोलिसांनी कारवाई करून चरस तस्करी करणाऱ्यांना रोखण्याचा प्रयत्न केला आहे.

पोलीस यंत्रणा कारवाई करीत असताना पालकांनी देखील याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. वेगवेगळ्या मोकळ्या ठिकाणी चरस, गांजा घेण्याचे प्रकार जिल्ह्यात अनेक भागात आहे. शहरी भागासह ग्रामीण भागात हे प्रकार होत आहे. दोनशे ते तीनशे रुपयानी गांजाचे पाकीट देऊन तरुणांना व्यसन बनविण्याचा घाट काही मंडळींनी घातला आहे. अंमली पदार्थाचा तरुणांना धोका निर्माण झाला आहे. याकडे सर्वांनी जागृत होऊन लक्ष देणे आवश्यक आहे.

लोकसंसद

## प्रार्थना स्थळांवरील भोंगे काढल्याबद्दल सरकारचे अभिनंदन!

मशिदींवरील अनधिकृत भोंगे हा मागील काही वर्षांपासून सरकारसाठी कळीचा मुद्दा बनला होता. यावरून अनेकदा वादही झाले आहेत. मुंबई उच्च न्यायालयानेही यामध्ये हस्तक्षेप करून अनधिकृत भोंगे काढण्याचे आदेश राज्य सरकारला दिले होते. त्यावर सध्याच्या सरकारने अत्यंत चतुराईने हा प्रश्न मार्गी लावला आहे. मुंबईतील धार्मिक स्थळांवर लावलेले १ हजार ६०८ भोंगे उतरवले गेल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच सभागृहात दिली या भोंग्यांमध्ये मशिदींवरील १ हजार १४९ भोंगे, मंदिरांवरील ४८, चर्चवरील १०, गुरुद्वार ४ आणि



अन्य धार्मिक स्थळांवरील १०४ भोंगे मुंबई पोलिसांनी हटवले आहेत. यासह संपूर्ण महाराष्ट्रात असलेल्या विविध धार्मिक स्थळांवरील ३ हजार ३६७ भोंगे पोलिसांनी हटवले आहेत. मुंबईतील भोंगे हटवताना कुठेही धार्मिक तणाव उत्पन्न होणार नाही याची पोलिसांनी विशेष काळजी घेतल्याने माननीय मुख्यमंत्र्यांनी मुंबई पोलिसांचे विशेष कौतुक केले आहे, तर मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र शासनाच्या या कृतीविषयी समाधान व्यक्त केले आहे. मुंबईतील भोंगे हटवल्यानंतर आता राज्यभरातील प्रार्थनास्थळांवरील भोंगे हटवणार असल्याची माहीतीही मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. राज्य सरकारने दाखवलेले धाडस नक्कीच कौतुकास पात्र असून भविष्यात हे भोंगे काहीनाकाही निमित्त करून पुन्हा प्रार्थना स्थळांवर चढणार नाहीत याची विशेष काळजी सरकारला घ्यावी लागेल. ध्वनी प्रदूषण हा मुंबई सारख्या वर्दळीच्या भागातील महत्वाचा प्रश्न आहे. प्रार्थना स्थळांवरील भोंगे त्यामध्ये भर टाकायचे काम करत होते. शांतता क्षेत्र, शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा, जेष्ठ नागरिक, आजारी माणसे यांची तमा न बाळगता वाजणारे हे भोंगे शहरातील अनेकांसाठी डोकेदुखी ठरले होते त्यामुळे सरकारने या डोकेदुखीतून मुंबईवासियांची मुक्तता केली आहे.

**– जगन घाणेकर, घाटकोपर**

दिनविशेष

# महाराष्ट्राचा विवेकी आवाज; प्रा.डॉ.एन.डी. पाटील

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचा आज जयंती. प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले.

प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. (१९६२) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा.डॉ.एन.डी.पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा.डॉ. एन.डी.पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले. प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली. प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा.डॉ.एन.डी.पाटील हे एक धडाडीचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा.डॉ.एन.डी.पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. १७ जानेवारी २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१५ जुलै

१)श्री. रवींद्र नारायण गावकर पंतनगर,अलिबाग, १५-०७-१९४१
२)श्री.सुधाकर अनंत पतंगे चेंढरे-अलिबाग, १५-०७-१९४७
३) श्री.विनायक शांताराम शिंपी चेंढरे-अलिबाग १५-०७-१९४८
४)श्री.विनोद नारायण भाटकर मु.आक्षी, अलिबाग १५-०७-१९४६
५)श्री.दिनकर महादेव पाटील चेंढरे, अलिबाग १५-०७-१९३७
६)श्री.महादेव गोविंद साखळकर सासवणे अलिबाग १५-०७-१९३९
७)श्री.विलास विनायक पाटील मु.वेश्वी,अलिबाग १५-०७-१९५५
८)श्री.केशव अर्जुन शेळके वेश्वी, अलिबाग १५-०७-१९३८
९)श्री.सुरेश शिवराम म्हात्रे मु.मांडवा,अलिबाग १५-०७-१९४२
१०)श्रीम.कुंदा रघुनाथ घरत अलिबाग, १५-०७-१९५१
११)श्री.(डॉ.)सुभाष शिवराम म्हात्रे मु.थळ, अलिबाग १५-०७-१९५७
१२)श्रीम सीमादेवी संभाजी कसबे वरसोली,अलिबाग १५-०७-१९६२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन





अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते




**स्व. श्रीमती कलावती भवानजी देढीया स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग**



**ईश्वरी अवधुत नाईक, वाढदिवस, साईगुलाब इंटरप्राइसेस, थळ पालथी**

**कै. विलास आत्माराम पाटील, पुण्यस्मरण, अलिबाग**

## सुवर्णकण



मन चंचल आहे म्हणून काहीच केले नाही तर काही मिळणार नाही ज्यायोगे मनाचा निग्रह होईल तो अभ्यास केला पाहिजे आरंभी अपयश आल्यासारखे वाटेल पण सातत्याने अभ्यास केला तर आपण यशस्वी होऊ.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

## वाहतूक विभागातील पोलिसांची आत्महत्या

**मुंबई :** विक्रोळी वाहतूक विभागातील एका पोलीस कर्मचाऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. शंकर कोळसे (५६) असे मृत पोलिसांचे नाव असून ते विक्रोळी पार्कसाईट येथील वर्षानगरमध्ये रहात होते. शनिवारी रात्री ते नेहमीप्रमाणे झोपण्यासाठी घराच्या वरच्या मजल्यावर गेले होते. सकाळच्या सुमारास त्यांना उठविण्यासाठी पत्नी वरच्या मजल्यावर गेली असता त्यांनी घरातील लोखंडी जिन्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे आढळून आले. त्यांना उपचारासाठी राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. दिड वर्षापूर्वी त्यांचा अपघात झाला होता. त्यावेळी पायाची शस्त्रक्रिया झाली होती. त्या दुखण्यामुळे ते त्रस्त होते. पायाच्या दुखण्याला कंटाळून त्यांनी ही आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

# सोनसाखळी चोराच्या शोधात हत्या प्रकरण उघडकीस

## • खून करून मृतदेह फेकला गटारात

**। अमरावती । प्रतिनिधी ।**

**अमरावती येथील गाडगेनगर पोलिसांचे पथक सोनसाखळी चोरीवर प्रतिबंध घालण्यासाठी आणि गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी पहाटे गस्तीवर निघाले होते. यावेळी गाडगेनगर परिसरातील पलाश लाईन येथे एक मुलगा पोलिसांना पाहून पळून जाताना दिसला. पोलिसांनी पाठलाग करून या मुलाला चौकशीसाठी ताब्यात घेतले. पोलिसांनी विश्वासात घेऊन विचारपूस केल्यानंतर पोलिसांना एक धक्कादायक माहिती मिळाली.**




या मुलाने सांगितले की, त्याने त्याच्या इतर तीन सहकाऱ्यांसोबत पुणे येथे राहणाऱ्या मित्राची हत्या केली आणि मृतदेह हा फ्रेझरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चांदूर रेल्वे मार्गावरील एसआरपीएफ कॅम्पच्या मागे टेकडीवरील नालीत फेकून दिला आहे. या हत्या प्रकरणाची कुणालाही माहिती नव्हती. हा संपूर्ण प्रकार गंभीर असल्याने गाडगेनगर पोलिसांच्या पथकाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर यांना ही माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी संपूर्ण चौकशी सुरू केली.

या मुलाचा मित्र रिझवान मुलानी हा पुण्यात राहणारा होता. सुमारे दहा दिवसांपूर्वी आपसातील वादातून तीन मुलांचे त्याच्यासोबत भांडण झाले. त्यातच या मुलांनी रिझवान याच्या डोक्यावर लोखंडी सळाख आणि पाईपने वार केले. त्यात रिझवान याचा जागीच मृत्यू झाला. या मुलांनी त्याचा मृतदेह एसआरपीएफ वसाहतीच्या मागे टेकडीवर निर्जन भागातील गटारात फेकून दिला होता.

मुलाने दिलेल्या माहितीच्या आधारे गाडगेनगर आणि फ्रेझरपुरा पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने घटनास्थळाची पाहणी केली. त्यावेळी त्यांना रिझवान याचा मृतदेह कुजलेल्या स्थितीत आढळून आला. घटनास्थळ हे निर्जन ठिकाणी असल्याने हे हत्या प्रकरण उघडकीस आले नाही, परंतु, जेव्हा गाडगेनगर पोलिसांचे पथक सोनसाखळी चोरांच्या शोधात होते, तेव्हा आकस्मिकरीत्या हाती आलेल्या विधिसंघर्षग्रस्त मुलाने हत्येची माहिती पोलिसांना दिली आणि ही घटना समोर आली.

अमरावती शहरात गंभीर गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन मुलांचा वाढता सहभाग हे चिंतेचा विषय बनला आहे. यापूर्वीदेखील हत्या प्रकरणांमध्ये विधिसंघर्षग्रस्त मुलांना ताब्यात घेण्यात आले आहे. या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

या गुन्ह्याचा तपास फ्रेजरपुरा पोलीस करीत आहेत. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर, विजया पंधरे, भारत वानखडे, राजेश गुरेले, गुलरेज खान, महेश शर्मा, नंदकिशोर करोची, रुपेश हटकर यांनी ही कारवाई केली.

# वारकरी शिक्षण संस्थेत तरुणीवर लैंगिक अत्याचार

**। पुणे । प्रतिनिधी ।**

आळंदी येथील केळगाव रस्त्यावर असलेल्या एका खासगी वारकरी शिक्षण संस्थेत तरुणीला डांबून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात एक महिला किर्तनकारसह पाच जणांवर बलात्कार, अपहरण आणि धमकी प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

पीडित तरुणी २ जून २०२५ रोजी घरी एकटी असताना तिच्या ओळखीच्या एका महिलेने तिला शेताकडे जाण्याचे कारण सांगून घराबाहेर नेले. त्याचवेळी वाटेत काळ्या रंगाच्या इर्टिगा गाडीतून आलेल्या आण्णासाहेब आंधळे, प्रविण आंधळे आणि एका अनोळखी चालकाने तिचे जबरदस्तीने अपहरण केले. तिने आरडाओरड केली असता ॲसिड टाकण्याची धमकी देण्यात



आली. नंतर तिला आळंदी येथील खासगी मुलींच्या वारकरी शिक्षण संस्थेत नेण्यात आले. तिथे आण्णासाहेब आंधळे, प्रविण आंधळे, कीर्तनकार सुनिता आंधळे आणि अभिमन्यू आंधळे यांनी तिला खोलीत डांबून ठेवले. फिर्यादीनुसार, या ठिकाणी आण्णासाहेब आंधळे यांनी तिच्यावर वारंवार शरीरसंबंधासाठी बळजबरी करत अत्याचार केले. या प्रकरणात पोलिसांनी आण्णासाहेब प्रल्हाद आंधळे, प्रविण प्रल्हाद आंधळे, अनोळखी वाहनचालक, सुनिता अभिमन्यु आंधळे आणि अभिमन्यु भगवान आंधळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# रेशन दुकानदारांचे कमिशन रखडले

**। संगमेश्वर । प्रतिनिधी ।**

संगमेश्वर तालुक्यातील रास्त भाव धान्य दुकानदारांचे गेल्या सहा महिन्यांपासून सुमारे एक कोटींपेक्षा अधिक कमिशन थकलेले आहे. त्यामुळे दुकानदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. याबाबत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करूनही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे दुकानदारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

संगमेश्वर तालुक्यात एकूण १३४ रास्त भाव धान्य दुकाने आहेत. यामध्ये अनेक सहकारी संस्था आणि बचत गट यांचाही समावेश आहे, जे शासनाच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा अविभाज्य भाग म्हणून नागरिकांना रास्त दरात धान्य पुरवण्याचे महत्त्वपूर्ण काम करतात. मात्र, गेले सहा महिने कमिशन न मिळाल्याने या सर्व दुकानदारांवर मोठा आर्थिक बोजा पडला आहे. यामुळे घरखर्च, कर्मचाऱ्यांचे वेतन, दुकानाचे भाडे आणि इतर दैनंदिन खर्च भागवणे दुकानदारांना कठीण झाले आहे. शासनाच्या



धोरणात्मक बदलांमुळे आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे ही समस्या निर्माण झाली आहे. यामुळे दुकानदारांमध्ये संभ्रम आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयात दुकानदारांकडून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. अनेकवेळा निवेदने देण्यात आली. तसेच संघटनांच्यावतीने वारंवार भेटी घेऊन कमिशन लवकरात लवकर अदा करण्याची मागणी केली आहे. मात्र, केवळ आश्वासनांपलीकडे काहीही हाती लागत नसल्याने दुकानदार हवालदिल झाले आहेत.

# डंपरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**मुंबई :** गोवंडीतील बैगनवाडी येथे राहणारे हसन इद्रीसी (१९) आणि त्याचा मित्र अशरफ शेख (२०) हे शनिवारी सकाळी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या सहलीसाठी रायगड किल्ल्याकडे जात होते. सहलीसाठी त्यांनी अधिकृत नोंदणी केली नव्हती. त्यामुळे ते दुचाकीने जायला निघाले होते. दरम्यान, मानखुर्दमधील टी-जंक्शनजवळ येताच मागून येणाऱ्या डंपरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या धडकेमुळे दुचाकी चालवणारा अशरफ रस्त्यावर पडला आणि जखमी झाला. तर मागे बसलेला हसन डंपरच्या मागील चाकाखाली चिरडला गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

# वालोटी नं.१ शाळेत आनंदोत्सव साजरा




**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ ऐतिहासिक गडकिल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ यादीत समावेश करण्यात आला. या किल्ल्यांमध्ये आपल्या रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील सुवर्णदुर्ग किल्ल्याचाही समावेश झाला आहे. या ऐतिहासिक क्षणाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये आपल्या संस्कृती व वारसा विषयी अभिमान निर्माण करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा वालोटी नं.१ येथे नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.


गडकिल्ल्यांची जनजागृती व्हावी यासाठी शाळा व विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जनजागृती फेरी काढण्यात आली. लेझीमच्या तालावर तसेच 'जय भवानी, जय शिवाजी' व 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशा घोषणा देत व ऐतिहासिक वेशभूषा धारण करून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरीमध्ये आनंदाने सहभाग घेतला. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश झालेल्या १२ गड किल्ल्यांच्या नावाचे शाळेच्या वार्ता फलकावर लेखन करून शाळेच्या शिक्षकांनी किल्ल्यांविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.

# वनविभागाने केले बिबट्याला जेरबंद

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

चिपळूण तालुक्यातील ओवळी बौध्दवाडी येथे गेल्या काही दिवसांपासून वन्यप्राणी बिबट्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले होते. मात्र, वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी यशस्वी सापळा रचून हा बिबट्याला अखेर जेरबंद केले. या संपूर्ण बचाव कार्यात वनविभागासोबत स्थानिक ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

रविवार दि. ६ जुलैपासून विलास मोहिते यांच्या गोठ्यात बिबट्या नियमितपणे येत असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी



तत्काळ वनविभागास माहिती दिली. यानंतर वनपाल एस. एस. सावंत (चिपळूण), वनरक्षक कृष्णा इरमले (कोळकेवाडी) आणि राहुल गुंठे (रामपूर) यांनी घटनास्थळी धाव घेतली. पाहणीत बिबट्या प्रत्यक्षात गोठ्यात असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर वनविभागाने ट्रॅप कॅमेरे आणि पिंजरे लावले. मात्र बिबट्या पिंजऱ्याकडे न जाता पुन्हा गोठ्यातच येत बसू लागला. वनविभागाने बिबट्याची तब्येत पाहणी केली असता तो अशक्त व आजारी असल्याचे आढळून आले. शुक्रवारी (दि. ११) गिरिजा देसाई, विभागीय वन अधिकारी, रत्नागिरी यांच्या सूचनेनुसार प्रियंका लगड, सहाय्यक वनसंरक्षक (चिपळूण) यांनी स्वतः घटनास्थळी भेट देऊन पिंजऱ्याची जागा बदलली. मोहिते यांच्या गोठ्यातच ट्रॅप पिंजरा लावून भक्ष ठेवण्यात आले आणि रात्री ८.३० वाजता बिबट्या अखेर पिंजऱ्यात अडकला. बिबट्याची वैद्यकीय पाहणी करण्यात आली असता तो नर जातीचा असून अंदाजे चार ते पाच वर्षांचा असल्याचे स्पष्ट झाले. त्याच्या मानेवर जखमही आढळून आली. त्यामुळे या जखमी बिबट्याला तत्काळ पुणे येथील रेस्क्यू ट्रान्सीट ट्रीटमेंट सेंटरमध्ये उपचारासाठी पाठवण्यात आले.

# विसर्जन घाटाची दुरवस्था

**खेड :** खेड शहरातील जगबुडी नदीजवळील गणेश विसर्जन घाटाच्या दुसऱ्या बाजूला नव्याने गणेश विसर्जन घाट उभारण्यासाठी कोट्यवधींचा निधी मंजूर झाला आहे. नवा गणेश विसर्जन घाट उभारण्यासाठी ६ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला; मात्र दोन वर्षांत उभारण्यात आलेली एक संरक्षक भिंत सद्यःस्थितीत कचऱ्याच्या ढिगाऱ्यात अडकली आहे. नगरपालिकेने जगबुडी नदीकिनारी कचरा टाकण्यास मज्जाव केलेला असतानाही या आदेशाला केराची टोपली दाखवत सर्रासपणे कचरा टाकला जात आहे.

# घराचे छप्पर कोसळले

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

कल्याण पूर्वेतील मंगल राघो नगर, गणेशनगर भागात चाळीतील एका घराचे जीर्ण झालेले छप्पर कोसळल्याची दुर्घटना रविवारी सकाळच्या सुमारास घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी घराचे मात्र मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

नरेश रंगारे आपली पत्नी व तीन लहान मुलांसह चाळीतील कौलारू घरात राहतात. घराचे लाकडी वासे वाळवी लागल्यामुळे कमकुवत झाले होते. रंगारे यांनी या अगोदरही छताची तात्पुरती दुरुस्ती केली होती. ते घरात झोपलेले



### सुदैवाने जीवितहानी नाही

असताना रविवारी पहाटे सहाच्या सुमारास कमकुवत झालेल्या वाशांना भिजलेल्या कौलांचा भार सहन न झाल्याने घराचे छत कोसळले. नशीब बलवत्तर म्हणून या दुर्घटनेतून रंगारे कुटुंबीय सुखरूप बचावले, मात्र रंगारे यांच्या पत्नीच्या डोक्याला किरकोळ दुखापत झाली. या दुर्घटनेत त्यांच्या घराचे घरातील सामानाचे नुकसान झाले आहे.

# जादा बसेसच्या संगणकीय आरक्षणाला प्रारंभ

**। दापोली । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सव सण दीड महिन्याभरावर आल्याने चाकरमान्यांची गावाकडे येण्यासाठी गाड्यांचे आरक्षण करण्याची लगबग सुरू आहे. गणपती सणासाठी गावी आलेला चाकरमानी हा पहिली पसंती एसटी सेवेला देतो. या चाकरमानी मंडळींच्या परतीच्या प्रवासासाठी दापोली आगार सज्ज झाले आहे. चाकरमान्यांचा परतीचा प्रवास सुखकर होण्यासाठी जादा बसेसच्या संगणकीय आरक्षणाला ११ जुलैपासून प्रारंभ करण्यात आले आहे. या बाबतची माहिती



आगार व्यवस्थापक यांच्याकडून प्राप्त झाली आहे.

दापोली आगारातून मुंबई, बोरिवली, नालासोपारा, ठाणे, भाईंदर, विठ्ठलवाडी, पुणे या मार्गावर चाकरमान्यांच्या परतीच्या प्रवासासाठी नेहमीच्या बसेस व्यतिरिक्त जादा बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. एसटीच्या प्रवाशांना सुखकर व सुरक्षित प्रवास करण्यासाठी सर्व चालक-वाहक, यांत्रिकी कर्मचारी व अधिकारी वर्ग सदैव तत्पर आहेत.

एसटीच्या प्रवासामध्ये ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत प्रवास, ६५ वर्षावरील व महिला प्रवाशांना ५० टक्के दरात प्रवास या सुविधा उपलब्ध असून मागणीनुसार दापोली तालुक्यातील विविध गावातून ४२ प्रवासी उपलब्ध झाल्यास ग्रुप बुकिंग सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जास्तीत जास्त प्रवाशांनी संगणकीय आरक्षण करून एसटीने प्रवास करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कंत्राटी सुरक्षारक्षकांवर उपासमारीचे संकट

## • तीन महिन्यांपासून पगारच नाही

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागात काम करणाऱ्या शेकडो कंत्राटी सुरक्षारक्षकांना गेल्या तब्बल तीन महिन्यांपासून पगारच मिळालेला नाही. त्यामुळे त्यांच्यासमोर उपासमारीचे संकट ओढवले आहे. याबाबत पालिका प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही दखल घेतली जात नसल्याने सुरक्षा रक्षकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे. कुटुंब कसे चालवणार, असा त्यांच्यासमोर प्रश्न पडला आहे.




मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत सुमारे दोन हजार कायम सुरक्षारक्षकांसह इतर तीन ते चार खासगी कंपन्यांची सुरक्षा सेवा घेण्यात आली आहे. या कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांना पालिका मुख्यालय, वॉर्ड ऑफिस, विविध विभाग, खाती, स्विमिंग पूल आणि पालिकेच्या कार्यालयांमध्ये ड्युटी करावी लागते. अशाच प्रकारे पालिकेने कंत्राटी तत्त्वावर सेवा घेतलेल्या सुरक्षारक्षक मंडळाच्या कामगारांना गेल्या तीन महिन्यांपासून पगार मिळालेला नाही. त्यामुळे या कंपनीकडे काम करणाऱ्या शेकडो कर्मचाऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

कंत्राटी तत्त्वावर नेमलेल्या कर्मचाऱ्यांना आधीच तुटपुंजा पगार दिला जातो. या कर्मचाऱ्यांना सुमारे १५ ते २० हजारांचा पगार दिला जातो. यामध्ये काही कंत्राटदार पगाराला कात्री लावून कमी रक्कम देत असल्याचा आरोपही काही कंत्राटी कामगार करतात.

त्यामुळे हे सुरक्षा रक्षक नेमणाऱ्या कंत्राटदारांवर पालिका प्रशासनाचे कोणतेही नियंत्रण, वचक नसल्याचेही कामगार सांगतात. आता तर मिळणारा तुटपुंजा पगारही मिळत नसल्याने आमच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे पालिकेला आतातरी जाग येणार का? असा सवालही उपस्थित केला जात आहे.


## रेल्वेचा प्रवास होणार अधिक सुरक्षित | रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची मंजुरी

# रेल्वेच्या प्रत्येक डब्यात सीसीटीव्ही बसवणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात असतानाच रेल्वे प्रशासनाने आता रेल्वेच्या प्रत्येक डब्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय घेतला आहे. गर्दीत वाद होणे, महिला प्रवाशांच्या बाबतीत गैरप्रकार घडणे अशा घटनांना आळा घालण्यासाठी रेल्वेने हे नवीन पाऊल उचलले आहे.**

सध्या प्रायोगिक स्वरूपात काही डब्यांत सीसीटीव्ही बसवले जाणार असून त्याचा सकारात्मक परिमाण सर्व डब्यांत टप्प्याटप्प्याने सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार आहेत. रेल्वेमंत्री



अश्विनी वैष्णव यांनी रेल्वेच्या ७४ हजार डब्यांमध्ये आणि १५००० इंजिनमध्ये सीसीटीव्ही बसवण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे रेल्वेचा प्रवास होणार सुरक्षित होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रत्येक प्रवेशद्वाराजवळ दोन कॅमेरे असतील. तसेच प्रत्येक डब्यामध्ये ४ डोम प्रकारचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. एक पुढील बाजूस, एक मागच्या बाजूस आणि दोन्ही बाजूंना प्रत्येकी एक अशा प्रकारे प्रत्येक इंजिनमध्ये ६ सीसीटीव्ही असणार आहेत.

तसेच, भारतीय रेल्वेने वेटिंग लिस्टवरील प्रवाशांसाठी नवे नियम लागू केले आहेत. आता प्रवाशांना त्यांचे तिकिट कन्फर्म झाले आहे की नाही, याची माहिती ट्रेन सुटण्याच्या २४ तास आधीच मिळणार आहे. यापूर्वी फक्त ४ तास आधी आरक्षण चार्ट तयार केला जात असे, त्यामुळे वेटिंग तिकिटधारकांना शेवटच्या क्षणापर्यंत प्रतीक्षा करावी लागत असे. मात्र आता नवीन निर्णयाचा लाखो रेल्वे प्रवाशांना फायदा होणार आहे. हा नवा नियम लवकरच देशभर लागू केला जाणार आहे. तत्काळ तिकिट बुकिंगच्या नियमांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तत्काळ तिकिटे पूर्वीप्रमाणे प्रवासाच्या एक दिवस आधीच बुक करता येतील व त्यांची कन्फर्मेशन प्रक्रिया पूर्वीप्रमाणेच राहणार आहे.

### वेटिंग लिस्टवरील प्रवाशांसाठी कठोर नियम

रेल्वेने वेटिंग लिस्टवरील प्रवाशांसाठी काही कठोर नियम लागू केले आहेत. वेटिंग लिस्टवर असलेल्या प्रवाशांना एसी किंवा स्लीपर कोचमध्ये प्रवास करता येणार नाही. अशा प्रवाशांनी फक्त जनरल कोचमधूनच प्रवास करता येईल. जर कोणी वेटिंग तिकिट घेऊन एसी किंवा स्लीपर कोचमध्ये प्रवास करताना सापडले तर त्याला दंड आकारण्यात येईल.

### कमी प्रकाशातही स्पष्ट चित्रफिती

प्रवाशांच्या गोपनीयतेचा विचार करताना, कॅमेरे केवळ डब्यांच्या सामान्य हालचाली क्षेत्रात (दरवाज्याजवळ) लावले जाणार आहेत. यामुळे डब्यांमधील खासगी भाग किंवा शयनक्षेत्र सुरक्षित राहील. रेल्वे प्रशासनाने जाहीर केले आहे की हे सर्व कॅमेरे एसटीक्युसी प्रमाणित असतील आणि कमी प्रकाशातही स्पष्ट चित्रफिती मिळतील. अगदी १०० किमी प्रतितासह वेगाने धावणाऱ्या गाड्यांमध्येही हे सीसीटीव्ही उत्तमरीत्या काम करू शकतील.

# श्रीवर्धनमध्ये रोठा सुपारी पुन्हा बाजणार

**। श्रीवर्धन । समीर रिसबूड ।**

**श्रीवर्धन तालुक्यातील सुपारी बागायतदारांचे निसर्ग चक्रीवादळात मोठे नुकसान झाले होते. या वादळात तालुक्यातील ७० टक्के पोफळींचे नुकसान झाले होते, तर उर्वरित पोफळींवर रोगराई, किडींचा प्रादुर्भाव झाल्याने श्रीवर्धन रोठा सुपारीच्या उत्पादनावर मोठा परिणाम झाला होता. या कारणास्तव श्रीवर्धन रोठा सुपारी नामषेश होण्याची भीती निर्माण झाली होती. परंतु, निसर्ग चक्रीवादळानंतर बागायतदारांनी रोठा लागवडीस प्राधान्य दिले असून, श्रीवर्धन सुपारी संशोधन केंद्र व नर्सरीमधून अद्यापपर्यंत पंचेचाळीस हजार रोपांची खरेदी तालुक्यातील बागायतदारांनी केली आहे.**

- **संशोधन केंद्रात रोपे विक्रीस**
- **चक्रीवादळात बागायतदारांचे मोठे नुकसान**

रोठा सुपारी रोपाची लागवड केल्यानंतर सहा ते सात वर्षांनी फळधारणा होत असल्याने बागायतदारांना पोफळींच्या वाढीसाठी जमीन व हवामानानुसार वाडीत पाणी सोडणे काढावे लागते. वाढीस लागलेल्या पोफळीस पाण्याचा खंड पडल्यास फळास गळ लागणे तर पावसाने फळ तडकणे या समस्या उद्भवतात. अनेक वेळा नुकत्याच लागवड केलेल्या रोपांच्या कोवळया सावळ्या खाण्यासाठी गुरे-ढोरे वाडीत येत असल्याने रोप चार वर्षाचे होईपर्यंत कुंपण घालून जपणूक करावी लागते तसेच तीव्र सूर्य किरणांपासून सरंक्षण होण्यासाठी बागायतदारांना रोपांभोवती कुंपण घालावी लागते. योग्य पाणी व खतांची मात्रा दिल्यास सातव्या



वर्षांपासून पोफळीना फळधारणा येण्यास सुरुवात होते.

श्रीवर्धन सुपारी संशोधन केंद्राचे अधिकारी डॉ. सिध्देश सावंत यांनी दिलेल्या माहितीनुसार, निसर्ग चक्रीवादळानंतर लागवड केलेल्या पंचेचाळीस हजार पोफळीपासून काही कालावधीत दरवर्षी एकशे तीस ते एकशे चाळीस मेट्रिक टन सुपारीचे उत्पादन अपेक्षित आहे. या हंगामासाठी श्रीवर्धन सुपारी संशोधन केंद्रात दहा हजार रोठा सुपारीची रोपे तयार करण्यात आली होती. त्यापैकी दीड हजार रोपांची विक्री झाली असून साधारण एक ते दीड वर्षांच्या रोपाची किंमत चाळीस रुपये इतकी आहे, असे सावंत यांनी सांगितले. तालुक्यात ३६५.२५ हेक्टर क्षेत्रात रोठा सुपारीची लागवड होती. सुपारीला समुद्र किनाऱ्यावरील गाळाची, पाण्याचा निचरा होणारी, तसेच बारमाही ओलावा असणारी जमीन मानवते. त्याचप्रमाणे २० ते ३५ सेल्सिअस तापमान योग्य आहे. रोठा सुपारीमध्ये पांढऱ्या गराचे प्रमाण जास्त असून खाण्यास मऊ व फळाचा आकार आकर्षक असल्याने बाजारात चांगला भाव मिळतो. रोठ्याचे वार्षिक उत्पादन ६२६.१७ मेट्रिक टन इतके होते. एका हेक्टर क्षेत्रात २.२५ मेट्रिक टन उत्पादकता असल्याने नैसर्गिक आपत्ती येण्याआधी तालुक्यातील बागायतदारांचे २०१५ ते २०२० या कालावधीतील सरासरी उत्पन्न अंदाजे तीन कोटी पंचाहत्तर लाख इतके होते, मात्र निसर्ग चक्रीवादळाने सुपारी बागायतदारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.

> **सुपारी लागवडीसाठी तालुक्यातील हवामान अनुकूल व पोषक असून तालुक्यात ३६५.२५ हेक्टर क्षेत्रात सुपारी लागवड झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत म. गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवडीसाठी रू २.१२ लाख प्रति हेक्टर अनुदान देण्यात येते.सुपारीचे ब्रँडिंग करून सुपारीला भौगोलिक मानांकन प्राप्त करण्यासाठी (GI nominations ) शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करून त्या अनुषंगाने प्रयत्न करण्यात येणार आहेत.**
> **–सुनिल जाधव**
> **तालुका कृषी अधिकारी, श्रीवर्धन**

## निवडक



### वेदक विद्यामंदिरात गुणवंतांचा सन्मान

**तळा :** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व गो. म. वेदक विद्यामंदिर तळाचे सन २०२४– २५ मधील इयत्ता १० वी १२ वीचे गुणवंत विद्यार्थी आणि ऑलिम्पियाड परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त मारुती शिर्के, चंद्रकांत रोडे, महेंद्र कजबजे, महादेव बैकर, डॉ. सतिश वडके, दिलीप ढाकणे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी १० वी व १२ वीच्या परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच ऑलिम्पियाड परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.




### लायन्स क्लबतर्फे जनजागृती

**पनवेल :** लायन्स क्लब पनवेल, लिओ क्लब पनवेल आणि लिओ क्लब पनवेल ल्यूमिना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनाचे अनोख्या पद्धतीने आयोजन करण्यात आले. समाजहिताच्या कार्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या लायन्स क्लब पनवेलने यावेळी 'धरती माँ वर्सेस मानव' या जनजागृती पथनाट्याच्या माध्यमातून पनवेल शहरातील पाच प्रमुख ठिकाणी जनतेमध्ये लोकसंख्या वाढीबाबत जागरूकता करण्यात आली. या उपक्रमास सत्येंद्र सिंह, आयुक्त विकास पवार, सुरभी पेंडसे, आरुषी गोडबोले, अनिका पोतदार, उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अशोक गिल्डा, ज्योती देशमाने, नागेश देशमाने, मंगला ठाकूर, प्रतिमा चौहान, मोतीलाल जैन, गौतम म्हात्रे, के. एस. पाटील, सुयोग पेंडसे, आरुशी गोडबोले, अदिश्री पाटील, कशिश गनजावे, श्रेया तावरे, आदित्य पुंडे, अनिका पोतदार, क्रिष्णा कडिअन, रिषा फर्नांडीस, स्वरा पेंडसे याच्या प्रयत्नातून जनजागृती उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

### मंगळागौर कार्यक्रमाचे आयोजन

**उरण :** समस्त महिलांना आत्मनिर्भर बनविण्याच्या दृष्टीने तसेच महिलांच्या विविध कला गुणांना, कला कौशल्यांना वाव देण्याच्या दृष्टीकोनातून, भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा जपला जावा या हेतूने कुटुंबिनी उरण महिला संघ या सामाजिक संस्थेतर्फे शनिवार (दि.२) ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता शेप्स जिमखाना टेरेस उरण येथे मंगळागौर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात सहभागी झालेल्या महिलांमधून सर्वोत्कृष्ट रंगभूषा, सर्वोत्कृष्ट उखाणा, सर्वोत्कृष्ट लक्षवेधी चेहरा, सर्वोत्कृष्ट नृत्य, सर्वोत्कृष्ट वेशभूषा, सर्वोत्कृष्ट शृंगार, सर्वोत्कृष्ट शृंगार व वेशभूषा (कुमारिका )महिला निवडण्यात येणार आहेत. त्यांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. विजयी स्पर्धेकांना रोख रक्कम व आकर्षक बक्षीसे दिली जाणार आहेत. कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नाव नोंदणीसाठी श्लोक पाटील–९००४११३८५८, आरती ढोले–९९६७९५५९३३ यांच्याशी संपर्क साधावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



### 'सहकार पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवा'

**अलिबाग :** राज्याच्या सहकार चळवळीमध्ये उत्कृष्ट योगदान दिलेल्या राज्यातील सहकारी संस्थांना शासनामार्फत सहकार पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती रायगड जिल्हा सहकारी संस्था उपनिबंधक प्र.का. जगताप यांनी दिली. दरम्यान, जिल्ह्यातील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणी झालेल्या इच्छुक सहकारी संस्थांनी आपले विहित नमुन्यांतील प्रस्ताव कालबद्ध कार्यक्रमानुसार दि. २ ते १८ जुलै या मुदतीत संबंधित सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयाकडे आवश्यक कागदपत्रांसह दाखल करावेत, सन २०२३–२४ या आर्थिक वर्षातील कामगिरीच्या आधारावर ''सहकार महर्षी'' पुरस्कार १, ''सहकार भूषण'' पुरस्कार २१ व ''सहकार निष्ठ'' पुरस्कार २३, याप्रमाणे सहकार पुरस्कारासाठी संस्थांची निवड करण्यात येणार आहे, अशी माहिती श्री. जगताप यांनी दिली. पुरस्कारासाठीचे निकष व गुणांचा तपशील याची सविस्तर माहिती मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाच्या https://sahakarayukta.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच या कार्यालयात उपलब्ध आहेत. तरी, रायगड जिल्ह्यातील इच्छुक संस्थांनी आपले प्रस्ताव उपरोक्त मुदतीत संबंधित सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, यांच्या कार्यालयाकडे आवश्यक कागदपत्रांसह दाखल करावेत, असे आवाहन जगताप यांनी केले आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- पिक-अप ४०७, आयशट डंपर वरील ड्रायवर पाहिजे आहेत झिराड आणि मांडवा येथील सपर्क : ८८०६६८३२३२ /८००७८९३२३२
- हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहे. १) नर्स ANM/GNM २) नर्स PRIVATE NURSING COURSE ३) मुले/मुली १२ वी पास, ४) X-RAY साठी मुले, आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र सोबत आणावे. संपर्क : ७७४५०५००२५/९११९५६५०२२/९३२१३०३९३८
- अलिबाग स्टँडजवळ 1BHK ब्लॉक भाड्याने देणे आहे, ९१६८०२८५१७, हॉस्पिटलला मावशी व वॉर्डबॉय पाहिजे आहेत.
- रानवडे हॉस्पिटलला पुरूष सफाई कामगार हवेत. उत्तम पगार. संपर्क : ९७६४९९५७२८
- जुनी कपडे शिवायची मशीन पाहिजे ९७६५९८४५२५/७४२०८९२३१२
- अलिबागमध्ये लेडीज ब्युटी पार्लरमध्ये कामासाठी अनुभवी मुली पाहिजे. मो. ८१४९८६५६२५, ९९२१०७३९६३
- घरकामासाठी अलिबागमध्ये बाई पाहिजे. मो. ८१४९८६५६२५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




## सार्तिडेत शैक्षणिक साहित्य वाटप

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

मुरूड तालुक्यातील सार्तिडे राजिप शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप शनिवार (दि.१२) जुलै करण्यात आले. आनंदी फांऊडेशनच्या स्तुत्य उपक्रमात अशोक तावडे व आदिती तावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा अमृता म्हात्रे व प्रिती म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीसह सार्तिडे ग्रामस्थ व पालकवर्ग यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रिती म्हात्रे यांनी केले होते.

## वाहतूक कोंडीच्या विळख्यात खारघर वसाहत

**। पनवेल । वार्ताहर ।**

वाढत्या वाहनांमुळे खारघर वसाहत वाहतूक कोंडीच्या विळख्यात सापडली आहे. वाहतूक पोलीस वाहतूक कोंडी सोडविण्याऐवजी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करून दंड वसूल करण्यावर भर देत असल्यामुळे रहिवाशांमध्ये नाराजी पसरली आहे.

खारघर परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नवी मुंबई वाहतूक विभागाने १५ वर्षांपूर्वी खारघरमधील हिरानंदानी पुलाखाली वाहतूक कार्यालय सुरु करण्यात आले. प्रामुख्याने नवरंग सर्कलकडून गोखले शाळेमार्गे शिल्प चौककडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहतूक विभागाने सम-विषम पार्किंग सुरु केली. नियमांचे उलंघन करणाऱ्यावर कारवाई करणे आवश्यक होते. मात्र, वाहतूक पोलिसांनी त्याकडे डोळेझाक केल्यामुळे होणाऱ्या कोंडीच्या त्रासामुळे सदर रस्त्यावरुन धावणाऱ्या बेस्ट आणि एनएमएमटी प्रशासनाला बसेस बंद कराव्या लागल्या. विशेषतः सायंकाळी पाच नंतर खरेदीसाठी घराबाहेर पडणारा दुचाकी, चार चाकी वाहन चालक रस्त्यावर मिळेल, त्या ठिकाणी उभी करीत असल्यामुळे बँक ऑफ इंडियाकडून शिव मंदिरकडे जाणाऱ्या मेट्रो मार्ग, नवरंग सर्कलकडून गोखले शाळा मार्गे शिल्पचौककडे जाणाऱ्या रस्त्यावर आणि सेक्टर-१३ शिल्पचौक शेजारी असेलल्या डेली बाजारचौक समोरील आणि शिल्प चौक समोरील रस्त्याचा दोन्ही बाजुला विविध दुकाने आणि शॉपिंग कॉम्प्लेक्स आहेत. सायंकाळी पाच नंतर वाहतूक पोलीस वाहतूक कोंडी सोडविण्याऐवजी दंडांत्मक कारवाई करुन वरिष्ठांकडून शाबासकी मिळविण्यात व्यस्त असल्यामुळे खारघरची वाहतूक कोंडीतून सुटका कशी होणार? असा प्रश्न खारघरवासियांना पडला आहे.

'सिडको'ने खारघर, सेक्टर-१२, १३, २० आणि २१ कडे जाणाऱ्या रस्त्याच्या मध्यभागी शिल्प चौक उभारले आहे. सेक्टर-१२ कडे जाणाऱ्या रस्त्याचा कडेला द-पॅसिपिक कमर्शियल इमारत आहे.

इमारतीच्या तळमजल्यावर खाद्य पदार्थ, दुकान, मोबाईल शॉप, रुग्णालय तसेच काही कार्यालये आहेत. दुसरीकडे बँका आणि विविध बँकेचे एटीएम, टुर्सच्या गाड्या, बस आणि रिक्षा थांबा आहे. त्यात दुकानातील व्यापारी, दुकानदार तसेच खरेदीसाठी येणारे ग्राहक रस्त्यावरच वाहने उभी करतात. त्यामुळे सकाळ-संध्याकाळ वाहतूक कोंडी होत असते विशेषतः सदर रस्ता अरुंद आहेत. त्यामुळे शिल्पचौक वाहतूक कोंडीच्या विळख्यात सापडला आहे.

## शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सन्मान

**। वावोशी । वार्ताहर ।**

राष्ट्रीय सामाजिक न्याय एवं मानव अधिकार आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. इन्द्रजीत धर्मराज गोंड यांच्या संकल्पनेतून 'नियोजन गुरु सन्मान' या उपक्रमाअंतर्गत विविध शाळांतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.



दरम्यान २५० पेक्षा अधिक शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. हा सन्मान पढ़ाई-लिखाई प्रोजेक्ट अंतर्गत आयोजित करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमात आनंद शाळा, सह्याद्री विद्यालय, जेसीएमएम स्कूल, शाळा क्रमांक ८, शाळा क्रमांक ९, जनता विद्यालय लौजी, आर. वी. व्ही इंटरनॅशनल स्कूल (डीपी रोड) या शाळांचा सहभाग होता. सर्व शाळांचे प्राचार्य, शिक्षक, सहाय्यक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या उपक्रमाचे उद्दिष्ट म्हणजे शिक्षकांच्या कार्याचा समाजात गौरव करणे आणि त्यांच्या सन्मानास अधिक सामाजिक मान्यता देणे. उपस्थित मान्यवरांनी शिक्षकांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला.

### लखिमळे कुटुंबातर्फे वृक्षारोपण

**पाली/ वाघोशी :** पालीतील लक्ष्मीबाई बाळकृष्ण लखिमळे यांचे मंगळवारी (दि.८) निधन झाले. त्यांच्या राख सावरण्याच्यानिमित्त गुरुवारी (दि. १०) त्यांच्या कुटुंबियांनी अस्थी व राख विसर्जन न करता खड्डा करून अस्थी व राख त्या खड्ड्यात टाकून तिथे वृक्षारोपण करण्यात आले. लखिमळे कुटुंबानी अशा प्रकारे एक विधायक पाऊल उचलले आहे. या वृक्षाचे संगोपन करण्याची जबाबदारी देखील लखिमळे कुटुंबियांनी स्वीकारली आहे.

## विहिघर येथे आरोग्य शिबीर

**। पनवेल । वार्ताहर ।**

शेतकरी कामगार पक्षाचे माजी जिल्हा परिषद सदस्य विलास फडके यांच्या वाढदिवसानिमित्ताने मंगळवार (दि.१५) जुलै रोजी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात मोफत डोळे तपासणी व चष्मा वाटपाचे आयोजन सकाळी १० ते दुपारी अडीच वाजेपर्यंत विहिघर येथे करण्यात आले आहे. यावेळी केवाळे, रिटघर, वाजे, नेरे हायस्कूल आणि नेरे जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात येणार आहेत. तसेच अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, ग्रुप ग्रामपंचायत चिपळे हद्दीतील सोसायट्यांना डस्टबिन वाटप करण्यात येणार आहे. वृद्धांसाठी स्टिक देण्यात येणार आहेत. तसेच सकाळी साडेदहा ते सायंकाळी तीन वाजेपर्यंत शासन आपल्या दारी योजनेअंतर्गत निराधार व विधवा महिला पेन्शन योजना, सुकन्या योजना नोंदणी, आयुष्यमान योजना, नवीन मतदान नोंदणी, रेशनकार्ड नवीन व जुने अपडेट करणे, पॅनकार्ड काढण्यात येणार आहेत. दुपारी तीन वाजता महिलांसाठी खेळ रंगला पैठणीचा, रात्री आठ वाजता संगीत दरबार आर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले आहे.

## भिक्षेकरीगृह रस्त्याची दुरवस्था

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील कुंडलिका नदीच्या बाजूनी जाणाऱ्या महिला व बाळ विकास अधीक्षक शासकीय भिक्षेकरीगृहाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. या मार्गांवरून जाणाऱ्या नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. या मार्गांनी प्रवास करतांना जाणारी वाहने ही मुंबई गोवा महामार्गवर पार्किंग करून नागरिकांना पायी चालत जावे लागत आहे.



महामार्गावरुन महिला व बाळ विकास अधीक्षक शासकीय पुरुष भिक्षेकारीगृहकडे जाणारा रस्ता एक ते दिड किलोमीटर अंतरावर असून या मार्गांकडे जाणारा सुरुवातीचा रस्ता वरून खाली गेला असून या रस्त्याला प्रचंड चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

### भातलागवड खोळंबली

**पाताळगंगा :** पावसाचे पुनरागमनामुळे बळीराजाला दिलासा मिळाला आहे. भात लागवड करण्यासाठी राब चांगले तयार झाले असून मजूरा अभावी भात लागवडीची कामे खोळंबळी आहेत. परिसरात भात लागवड सुरु असून या कामासाठी मजूरांची मनधरणी करत आहेत. काहीच्या शेत मजूर आभावी शेतीची कामे खोळंबली आहेत. प्रत्येक जण मिळेल त्या मजुरीने मजूर घेऊन भात लागवड गेल्या आठवड्यापासून करत आहे

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**। वावोशी । वार्ताहर ।**

माजी विद्यार्थी सामाजिक संस्था, वावोशी विभाग यांनी (दि.१२) जुलै रोजी राजिप शाळा, नारंगी येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी नरेश पाटील यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक केले, तर प्रफुल्ल देशमुख यांनी संस्थेचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैद्यकीय आणि क्रीडा क्षेत्रातील उद्दिष्ट सविस्तर मांडले. नारायण मोरे, हरिश्चंद्र पाटील, शांताराम जाधव, चंद्रकांत कार्लेकर, ज्योती माणकवले, पालकवर्ग यांनी उपक्रमासाठी सहकार्य केले.




संदीप देशमुख, समीर देशमुख, राहुल देशमुख, जितेंद्र देशमुख, आनंद देशमुख यांनी संस्थेला देणगी दिली. यावेळी भारती आरावकर, देवेंद्र देशमुख, वाघुले, बाबू जाधव, उद्धव देशमुख, पंकज देशमुख, शिक्षकवृंद, ग्रामस्थ आणि अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**गैरसोयींमुळे पायी प्रवास | टॅक्सी पकडण्यासाठी रांगा**

# वाहतूक कोंडीचा पर्यटकांना फटका

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**माथेरान पर्यटन स्थळी रविवारी हजारो पर्यटक आले होते. पर्यटकांना सायंकाळी परतीच्या प्रवासाच्या वेळी प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. घाटरस्त्यात वाहने अडकून पडल्याने पर्यटकांना चालत घाटरस्ता उतरावा लागला. सर्व गैरसोयींमुळे पर्यटकांचे हाल होताना पाहायला मिळाले. वाहतूक कोंडीमुळे पोलीस प्रशासन देखील हतबल झाले होते.**

दरम्यान, शनिवार-रविवारी होणारी पर्यटकांची गर्दी लक्षात घेऊन प्रशासनाने नियोजन करायला हवे




अशा सूचना सातत्याने होत आहे. माथेरानमध्ये पावसाळ्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे. दररोज चार-पाच हजार पर्यटक येत असतात. संध्याकाळी धुके आणि पाऊसाचा आनंद घेत असतात. तर शनिवार आणि रविवारी वर्षा सहलीचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांचे तांडे माथेरानकडे पहाटेपासून सुरु होतात, त्यामुळे सकाळी नऊ वाजल्यापासून वाहतूक कोंडीला सुरुवात होते. पर्यटकांची वाहने आणि टॅक्सी गाड्यांच्या कोंडीमुळे पर्यटकांना वॉटर पाईप स्टेशनपर्यंत आपले सामान सोबत घेऊन पायी प्रवास करावा लागत होता. सायंकाळी पर्यटक दस्तुरी येथील वाहनतळावरुन परतीच्या प्रवासासाठी निघालेले पर्यटकांची टॅक्सी पकडण्यासाठी झालेली गर्दीमुळे वाहतूक कोंडी घाट रस्त्यात दिसून आली.

घाटात चांगभले मंदिराच्या खाली पर्यटकांनी टॅक्सी पकडण्यासाठी रांगा लावल्या होत्या. त्या पॉईंटपर्यंत ७०० मीटर रस्ता चालत पर्यटकांना जावे लागत होते. तर तेथून देखील टॅक्सी सहज उपलब्ध होत नव्हती. त्यामुळे टॅक्सीसाठी लागलेल्या रांगा बघून पर्यटक चालतच पुढे घाटरस्ता उतारताना दिसत होते.

पर्यटकांना पेब किल्ला पॉईंट आणि वॉटर पाईप येथे टॅक्सी मिळत होत्या. या वाहतूक कोंडीमुळे बंदोबस्त करण्यासाठी असलेले पोलीस देखील हतबल झालेले दिसून येत होते. दरम्यान या सर्वांचा फटका पर्यटकांना चागंलाच बसला.

> **पर्यटकांचे मेगा हाल**
> **अभूतपूर्व गर्दीमुळे मौजमजा करून निघालेले पर्यटक पायी चालून थकून गेल्याचे चित्र पाहयला मिळत होते. पर्यटकांना आपल्या चिमुकल्यांसह पायी प्रवास करावा लागला होता.**

### खालापूरात संचलन

**वावोशी :** आगामी सण आणि उत्सवांच्या पार्श्वभूमीवर खालापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत सोमवार (दि.१४) जुलै पोलीस संचलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चौक फाटा व शिवाय हॉटेल समोर संचलन करण्यात आले. त्यानंतर कर्जत चौक फाटा, तारापूर, चौक बाजारपेठ, तारापूर चौक अशा पद्धतीने या मार्गावरू करण्यात आले. यावेळी खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन पवार, बाविस्कर, राईट कंट्रोल फोर्सचे तीन प्रशिक्षक, पोलीस मुख्यालयातील ७२ अंमलदार, वडखळचे आरसीपीचे ३५ जवान, तसेच खालापूर पोलीस ठाण्याचे तीन अधिकारी व १४ अंमलदार सहभागी झाले होते.

## उपविभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव, जि. रायगड यांजकडून

### अधिसूचना

क्र.उविअ/□□/कात-२/□.मा.औ.क्षे./जावटे/एस.आर.६०/२०११ - ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा.३) चे कलम १, पोट - कलम (३) अन्वये महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. २००७/(३३४) उद्योग - १४, अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे त्या अधिसूचनेच्या अनुसूचित विनिर्दीष्टीत करण्यात आलेल्या क्षेत्रास दिनांक १९ फेब्रुवारी, २००९ पासून लागू करण्यात आले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाचे कलम ३२ अन्वये ज्या क्षेत्रात उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण ६ लागू करण्यात आले आहे, त्या क्षेत्रातील जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास औद्योगिक किंवा उपरोक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संपादन करण्याचा अधिकार महाराष्ट्र शासनास प्रदान केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे क्र. आयडीसी/(१८९२)/१७४४१/उद्योग-१४, दिनांक ११ जून १९९३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे क्र. आयडीसी/२१०६/(४८५)/उ-१४, दिनांक १० नोव्हेंबर २००६ अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६२ च्या नियम २८ ने जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले उपरोक्त नियमाची कलमे ३२, ३६ व ३८ चे अधिकार आणि नियमाचे कलम २ (क) अन्वये उप विभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव यांना कार्यान्वित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत ;

आणि ज्याअर्थी, सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेले क्षेत्र महामंडळास दिल्ली - मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडोर अंतर्गत रोहा - माणगांव औद्योगिक क्षेत्रासाठी संपादन करण्यात आले असून महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(२), ३२(१), ३२(५) व कलम ३२(६) अन्वये कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे, तसेच जमीन मालकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३३(३) अन्वये □र्वा□धा□ण /अनिवार्य निवाडे घोषित करून नुकसान भरपाई वाटपाबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे;

त्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(७) चा वापर करून अनुसूचित नमूद केलेल्या जमिनी उपरोक्त कारणासाठी संपादीत करून व ताब्यात घेवून ती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांजकडे हस्तांतरण करीत असल्याबाबतची अधिसूचना उपविभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगाव हे प्रसिध्द करीत आहेत.

### अनुसूची
### □□-माणगांव औद्योगिक क्षेत्र
### जिल्हा रायगड, ता. माणगांव, मौजे - जावटे

| अ. क्र. | □र्वे□ नं□□ | □□□□ा नं□□ | जमिनीचे क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | १ | २ क | ०.१५७० |
| २ | १ | ४ | ०.०६१० |
| ३ | १ | ५ | ०.०७०० |
| ४ | १ | ६अ | ०.०६६० |
| ५ | १ | ६□पै | ०.००५० |
| ६ | ४ | ४ | ०.०६०० |
| ७ | ४ | ५अ | ०.२००० |
| ८ | ४ | ५ क | ०.२८२० |
| ९ | ४ | ७ | ०.०२३० |
| १० | ४ | १५ | ०.०९६० |
| ११ | ४ | १६ | ०.००८० |
| १२ | ५ | ४ | ०.०१०० |
| १३ | ६ | २□ पै | ०.०३२८ |
| १४ | ६ | २ क | ०.३१२० |
| १५ | ६ | ३ ड | ०.०१०० |
| १६ | ७ | १अ | ०.०१५० |
| १७ | ११ | १ | ०.०१५० |
| १८ | ११ | २इ | ०.००८० |
| १९ | १२ | १ पै | ०.००२० |
| २० | १२ | २/२ (२अ) | ०.०१५० |
| २१ | १२ | ३/३ (३□) | ०.०५६० |
| २२ | १२ | ३/६ पै (३इ) | ०.००२० |
| २३ | १३ | १ क पै | ०.००१० |
| २४ | १३ | १इ | ०.०१०० |
| २५ | १३ | १ फ पै | ०.०४३८ |
| २६ | १३ | १ ख पै | ०.०३४८ |
| २७ | १३ | ५/५+६+७अ (५ई) | ०.४६०० |
| २८ | १३ | ५/९/८ड (५ग) पै | ०.००९० |
| २९ | १४ | १/७ (१ ज) | ०.०२०० |
| ३० | १४ | ३/२ (३अ) | ०.३०३० |
| ३१ | १४ | ३/३ (३□) | ०.०५६० |
| ३२ | १४ | ३/४ (३क) | ०.११०० |
| ३३ | १४ | ३/५ (३ड) | ०.११५० |
| ३४ | १४ | ३/७ (३फ) | ०.००८० |
| ३५ | १४ | ३/१० (३ग) पै | ०.००३० |
| ३६ | १६ | २/१ | ०.१८०० |
| ३७ | १६ | २/१० पै (ख) | ०.००१० |
| ३८ | १७ | १/२ (□) | ०.०१०० |
| ३९ | १७ | १/३ पै (क) | ०.००८० |
| ४० | १७ | १/५. (इ) | ०.०४०० |
| ४१ | १७ | १/६ पै (फ) | ०.००९२ |
| ४२ | १७ | ५ | ०.०४०० |
| ४३ | १९ | पै | ०.१६०० |
| ४४ | २० | १ पै | ०.०३७५ |
| ४५ | २१ | १ पै | ०.००५० |
| ४६ | २३ | १ क | ०.४८३० |
| ४७ | २३ | १ इ पै | ०.००९० |
| ४८ | २३ | १फ पै | ०.००६० |
| ४९ | २३ | १ज पै | ०.००६० |
| ५० | २५ | १ | ०.८९२० |
| ५१ | २६ | ६ पै | ०.०४०० |
| ५२ | २६ | १३ | ०.००८० |
| ५३ | २७ | ५□ पै | ०.००९२ |
| ५४ | २७ | ५ क पै | ०.०००८ |
| ५५ | २७ | ५ड | ०.००५० |
| ५६ | २७ | ५इ | ०.००८० |
| ५७ | २७ | ५फ | ०.००५० |
| ५८ | २९ | २/२ (□).पै | ०.०३०० |
| ५९ | २९ | २/७. (ग) | ०.०१५० |
| ६० | ३० | १ क | ०.१३०० |
| ६१ | ३० | २अ पै | ०.०३४८ |
| ६२ | ३१ | ३ पै | ०.००१८ |
| ६३ | ३४ | १ क पै | ०.००३४ |
| ६४ | ३४ | १ न | ०.०६०० |
| ६५ | ३५ | १□ पै | ०.१६२० |
| ६६ | ३५ | १ क पै | ०.००२४ |
| ६७ | ३५ | १ □ | ०.०१०० |
| ६८ | ३६ | ३ पै | ०.०६२० |
| ६९ | ३७ | १□ पै | ०.००६० |
| ७० | ३७ | १ क | ०.०१२० |
| ७१ | ३७ | १ फ पै | ०.००६० |
| ७२ | ३७ | १ ज (ग) | ०.०१०० |
| ७३ | ३७ | ५ | ०.०३०० |
| ७४ | ३७ | १२ | ०.०१०० |
| ७५ | ३७ | १८/३ (□) पै | ०.०२३० |
| ७६ | ३७ | २६ड | ०.०४०० |
| ७७ | ३७ | २६ इ | ०.०१०० |
| ७८ | ३८ | १५ | ०.१७०० |
| ७९ | ३९ | ६ | ०.०२०० |
| ८० | ३९ | १६ पै | ०.१३३४ |
| ८१ | ४० | १६ अ पै (४०/१६अ व ४०/१६/१/१) | ०.६२०० |
| ८२ | ४० | १६□ | ०.१३०० |
| ८३ | ४० | १६ क | ०.०४०० |
| ८४ | ४० | १६ड | ०.०३०० |
| ८५ | ४० | १६ इ | ०.०१०० |
| ८६ | ४० | १६फ | ०.०३०० |
| ८७ | ४० | १९अ पै | ०.०३७५ |
| ८८ | ४० | १९□ पै | ०.२५०० |
| ८९ | ४० | १९ क | ०.०१०० |
| ९० | ४० | १९ड | ०.०४०० |
| ९१ | ४० | १९ इ | ०.०१०० |
| ९२ | ४० | २० | ०.३७०० |
| ९३ | ४० | २२ | ०.११०० |
| ९४ | ४१ | २ □ पै | ०.०१२० |
| ९५ | ४१ | ३ क पै | ०.०२७० |
| ९६ | ४१ | ३ ग पै | ०.११७० |
| ९७ | ४१ | ३ ख पै | ०.०२७० |
| ९८ | ४१ | ४ क पै | ०.०१२० |
| ९९ | ४४ | ३ म पै | ०.०४५० |
| १०० | ४४ | ५ पै | ०.०१५० |
| १०१ | ४४ | ९ पै | ०.०१५० |
| १०२ | ४४ | १० | ०.०४०० |
| १०३ | ४५ | १०□ | ०.०५०० |
| १०२ | ४५ | १२ ड पै | ०.१००० |
| १०५ | ४५ | १९ फ पै | ०.०२४० |
| १०६ | ४५ | १९ □ | ०.०४०० |
| १०७ | ४५ | २४ अ पै | ०.०३५० |
| १०८ | ४६ | ५ पै | ०.११०० |
| १०९ | ४६ | १४ इ पै | ०.०१९० |
| ११० | ४६ | २१ पै | ०.०५०० |
| १११ | ४९ | १०अ | ०.०५०० |
| ११२ | ४९ | १० क | ०.०९०० |
| ११३ | ४९ | १० इ | ०.१५०० |
| ११४ | ४९ | १३ □ | ०.०३०० |
| ११५ | ५० | ८ | ०.०१०० |
| ११६ | ५० | ९ | ०.०२०० |
| ११७ | ५१ | १२□ | ०.०१०० |
| ११८ | ५२ | ११ क | ०.०५०० |
| ११९ | ५२ | ११ इ | ०.०२०० |
| १२० | ५२ | ११ज पै | ०.०७०० |
| १२१ | ५२ | ११ म पै | ०.०४५० |
| १२२ | ५२ | १२ पै | ०.१७३० |
| १२३ | ५३ | ३ पै | ०.००४७ |
| १२४ | ५८ | २ अ | ०.०२५० |
| १२५ | ५८ | २ क | ०.०२८० |
| १२६ | ६२ | १□ पै | ०.००६० |
| १२७ | ६२ | ३ | ०.०५०० |
| १२८ | ६४ | १अ पै | ०.००१० |
| १२९ | ६९ | २ पै | ०.००१३ |
| १३० | ७० | १ पै | ०.०००६ |
| १३१ | ७३ | पै | ०.०६८० |
| १३२ | ७९ | पै | ०.०६३० |
| | | | ९.०१५० |

माणगांव

दिनांक :- १०/०७/२०२५

सही/-
(डॉ. संदीपान □ानप)
उपविभागीय अधिकारी,
माणगांव उप□□ाग, माणगांव

क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/९९/९५८/२०२५

## शिक्षिकेच्या दागिन्यांची चोरी

। पनवेल । प्रतिनिधी ।

छत्रपती संभाजी नगर येथून खासगी ट्रॅव्हल्समधून प्रवास करणाऱ्या एका शिक्षिकेचे अडीच लाख रुपये किमतीचे दागिने अज्ञात चोरट्याने प्रवासादरम्यान चोरल्याची घटना उघडकीस आली आहे. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे

मीना हानवते (४६) असे या शिक्षिकेचे नाव असून, त्या छत्रपती संभाजी नगर येथे राहतात. जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत असलेल्या मीना यांची विवाहित मुलगी कळंबोलीत राहते. त्या पतीसह श्रेयस ट्रॅव्हल्स या खासगी बसने कळंबली येथे येत होत्या. दरम्यान, त्यांनी त्यांच्यासोबत २ लाख ५६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने घेतले होते. दागिने असलेला बॉक्स त्यांनी बॅगेमध्ये ठेवून ही बॅग सीटच्या वरच्या भागात ठेवली होती. पहाटे सव्वा दोनच्या सुमारास त्यांची बस जेवणासाठी सुपे येथील हॉटेल निसर्ग येथे थांबली होती. त्यावेळी हानवते दाम्पत्य बसमधून खाली उतरले होते. त्यानंतर त्यांची बस सकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास कळंबोली येथे पोहोचल्यानंतर हानवते दाम्पत्य रिक्षाने आपल्या मुलीच्या घरी गेले. तेथे पोहोचल्यानंतर त्यांनी आपली बॅग तपासली असता, त्यातील बॉक्समधील दागिने गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. बसमधून प्रवास करताना चोरट्याने त्यांचे दागिने चोरल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंद करून शोध सुरू केला आहे.

## मराठा समाजाकडून विद्यार्थी, पालकांचा गुणगौरव

। पनवेल । प्रतिनिधी ।

सकल मराठा समाज मंडळ, खांदा कॉलनी यांच्यावतीने आयोजित विद्यार्थी-पालक गुणगौरव सोहळा २०२५ मोठ्या उत्साहात मराठा भवन, सेक्टर ९ खांदा कॉलनी येथे संपन्न झाला. या कार्यक्रमात इयत्ता दहावी व बारावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात 'गुरुमंत्र यशाचा' या विशेष शैक्षणिक मार्गदर्शन सत्राने झाली, ज्याचे मार्गदर्शन प्रा. गिरीश चव्हाण (वर्धिष्ण फाऊंडेशन, खांदा कॉलनी) यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना यशाकडे नेणाऱ्या मार्गावर प्रेरणादायी विचार दिले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून विधान परिषदेचे आ. विक्रांत बाळासाहेब पाटील यांची उपस्थिती लाभली. मराठा समाजाचे नेते रामदास शेवाळे, रुपेश ठोंबरे यांनीदेखील मराठा भवन कार्यालयात उपस्थित राहून गुणगौरव कार्यक्रमाचे कौतुक केले. सकल मराठा समाज मंडळ खांदा कॉलनीचे सल्लागार रामचंद्र ढोबळे, शिवाजी दांगट, अध्यक्ष संतोष जाधव, सचिव सदानंद शिर्के यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले. विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचादेखील विशेष सन्मान झाला. या उत्साही सोहळ्यास सकल मराठा समाज मंडळाचे सर्व सदस्य, पदाधिकारी व समाजबांधव, विध्यार्थी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## मराठी शाळेच्या नूतनीकरणासाठी आर्थिक मदत

। तळा । प्रतिनिधी ।

**अरुणा बापट यांची सामाजिक बांधिलकी**

तळा शहरातील रायगड जिल्हा परिषदेच्या मराठी (दगडी शाळा) शाळेच्या नूततीकरणासाठी समाजसेविका अरुणा बापट यांनी पाच लाख रुपयांचा निधी दिला आहे.अरुणा बापट या माजी शिक्षिका असून, सध्या समाजसेविका म्हणून त्यांच्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्यासाठी मोठ्या प्रमाणावर मदत केली जाते.

तळे मराठी (दगडी शाळा) ही जवळपास एकशे चौसष्ट वर्षे जुनी शाळा असून, या शाळेचा इतिहास पाहता भारताचे पहिले अर्थमंत्री डॉ. चिंतामणराव देशमुख यांनी याच शाळेत आपले प्राथमिक शिक्षण घेतले आहे. तसेच तालुक्यातील अनेक यशस्वी उद्योजक, राजकारणी, व्यापारी व अधिकारी यांनी याच शाळेतून शिक्षण घेऊन आपले जीवनमान उंचावले आहे. या शाळेचे नूतनीकरण करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते व रायगड भूषण कृष्णा महाडिक यांच्याकडे शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकांकडून करण्यात आली होती. या शाळेचा ऐतिहासिक वारसा लक्षात घेऊन कृष्णा महाडिक यांनी आपल्या प्रयत्नातून माजी शिक्षिका व समाजसेविका अरुणा बापट यांच्याकडे प्रस्ताव मांडला असता त्याला लगेच मंजुरी देत अरुणा बापट यांनी शाळेच्या नूततीकरणासाठी पाच लाखांचा निधी मंजूर केला. त्याचा धनादेश कृष्णा महाडिक यांनी शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकांच्या हस्ते सुपूर्द केला. याप्रसंगी शिक्षक सुनील बैकर, मित्तल वावेकर, संदीप कांबळेकर, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा वेदिका गोरीवले यांसह पालक उपस्थित होते.

# निवडक

## साळवी चषक रंगणार पुण्यात

**पुणे :** ३री कबड्डी महर्षी स्व. शंकरराव(बुवा) साळवी चषक निमंत्रित पुरुष, महिला राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा दिनांक १६ ते २० जुलै २०२५ या कालावधीत पुणे, म्हाळुंगे येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल येथील बॅडमिंटन हॉलमध्ये मॅटच्या क्रीडांगणावर रंगणार आहे. त्याच्या बरोबरीने १२वी पुरुष, महिला पुणे जिल्हा लीग कबड्डी स्पर्धादेखील होणार आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या सहकार्याने सतेज संघ बाणेर यांच्या विद्यमाने राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तर बाबुराव चांदेरे फाउंडेशन यांच्या विद्यमाने पुणे लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यातील नामांकित अशा १२ पुरुष व १२ महिला संघाना निमंत्रित करण्यात आले आहे. तर पुणे जिल्हा कबड्डी लीग स्पर्धेकरिता पुण्यातील छावा पुरंदर, लय भारी पिंपरी चिंचवड, शिवनेरी जुन्नर, सिंहगड हवेली, वेगवान पुणे, बलाढ्य बारामती, झुंजार खेड आणि माय मुळशी असे पुरुष व महिला खेळाडूंचे आठ आठ संघ तयार करण्यात आले आहेत. स्पर्धेतील अंतिम विजेत्या चारही संघांना प्रत्येकी चषक, पदक व रुपये दोन लाख पन्नास हजार प्रदान करण्यात येतील. उपविजेत्या चारही संघांना प्रत्येकी चषक, पदक व रुपये एक लाख पन्नास हजार बक्षीस दाखल देण्यात येतील. उपांत्य उपविजयी आठही संघाना प्रत्येकी चषक, पदक व रुपये एक लाख इनाम देण्यात येईल. स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू, उत्कृष्ट चढाई व पकड यांना प्रत्येकी रुपये पंचवीस हजार देऊन गौरविण्यात येतील.

## शर्यतीदरम्यान घसरून पडला साबळे



**नवी दिल्ली :** भारताचा धावपटू अविनाश साबळे याला मोनॅको डायमंड लीगमध्ये दुखापतीचा सामना करावा लागला, मात्र त्याची ही दुखापत गंभीर नसल्याचे प्रशिक्षक अमरीशकुमार यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले. तो एक ते दोन आठवड्यांत तंदुरुस्त होईल, असाही विश्वास त्यांच्याकडून व्यक्त करण्यात आला.

अविनाश साबळे ३,००० मीटर अडथळा शर्यतीदरम्यान घसरून पडला. त्यामुळे त्याला शर्यत सोडावी लागली. ऑलिंपियन ३० वर्षीय साबळेने या शर्यतीत टॉप पाचमध्ये स्थान मिळवण्याची अपेक्षा व्यक्त केली होती; परंतु शर्यतीच्या सुरुवातीलाच घसरून पडल्यामुळे किरकोळ दुखापत झाली आणि शर्यत पूर्ण करता आली नाही. साबळेने याआधीच्या डायमंड लीग स्पर्धांमध्ये अनुक्रमे तेरावे आणि आठवे स्थान मिळवले होते. त्यामुळे २०२४च्या हंगामात तो आपला सर्वोत्तम फॉर्म गाठू शकलेला नाही; मात्र तो टोकियोतील जागतिक स्पर्धेसाठी आधीच पात्र ठरलेला आहे. अमरीशकुमार म्हणाले की, अविनाश साबळेला किरकोळ दुखापत झाली आहे. त्याला विश्रांती घ्यायला हवी. एक ते दोन आठवड्यांमध्ये तो तंदुरुस्त होऊ शकतो. काळजी करण्याचे कारण नाही. स्पर्धेत सहभागी होत असलेल्या इतर धावपटूला वाचवण्याचा प्रयत्न करीत असताना साबळे पडला व त्याला दुखापत झाली. अविनाश साबळे १५ जुलै ते ३ सप्टेंबर यादरम्यान अमेरिकेत सराव करणार आहे. केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडून यासाठी हिरवा कंदील दाखवण्यात आला आहे.

## सायनाचा झाला घटस्फोट

**नवीदिल्ली :** भारताची स्टार बॅडमिंटनपटू आणि ऑलिंपिक पदक विजेती सायना नेहवालने तिच्या वैयक्तिक आयुष्यातील



एक धक्कादायक निर्णयाची घोषणा केली. सायना आणि तिचा पती पारुपल्ली कश्यप यांनी घटस्फोट घेतल्याची बातमी तिने दिली. सायनाने सोशल मीडिया स्टोरीद्वारे ही माहिती शेअर करून देशभरातील बॅडमिंटन चाहत्यांना धक्का दिला. सायना आणि भारताचा माजी नंबर-१ पुरुष बॅडमिंटन स्टार पारुपल्ली कश्यप हे दोघे दीर्घ काळ रिलेशनशिपमध्ये होते. त्यानंतर त्यांनी २०१८ मध्ये लग्न केले होते. पण आता ७ वर्षांनंतर दोघांनी घटस्फोट घेतला आहे. मात्र त्यांच्या वेगळे होण्याचे खरे कारण अद्याप कळलेले नाही. दोघांनी विचार करून घेतलेला निर्णयसायनाने रविवारी (दि.१३) रात्री उशिरा इंस्टाग्रामवर स्टोरी पोस्ट करून ही घोषणा केली. सायनाने पोस्टमध्ये म्हटले आहे, आयुष्य कधीकधी आपल्याला वेगळ्या दिशेने घेऊन जाते. खूप विचार केल्यानंतर, पारुपल्ली कश्यप आणि मी वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही दोघेही स्वतःसाठी आणि एकमेकांसाठी शांतता, प्रगती आणि विरामाचा मार्ग निवडत आहोत.

## सिराजला सेलिब्रेशन पडले महागात!

**लॉर्डस :** भारत आणि इंग्लंड संघात सध्या लॉर्ड्सवर कसोटी मालिकेतील तिसऱ्या सामन्यात दोन्ही संघांमध्ये गरमागरमी झाल्याचेही दिसले. या सामन्यात वेळ वाया घालवण्यावरून तिसऱ्या आणि चौथ्या दिवसाच्या अखेरीस दोन्ही संघांच्या खेळाडूंमध्ये शाब्दिक चकमक झाल्याचे दिसले होते. याचदरम्यान आता सिराजला चौथ्या दिवशी आक्रमक सेलीब्रेशन करणे महागात पडले आहे. सिराजच्या गोलंदाजीवर बेन डकेटचा झेल १२ धावांवर जसप्रीत बुमराहने घेतला. त्यामुळे डकेटला विकेट गमवावी लागली. त्यावेळी सिराजने बाद झालेल्या डकेटच्या समोर जाऊन आक्रमक सेलिब्रेशन करत त्याला डिवचण्याचा प्रयत्न केला होता.पण, आता त्याच्या या आक्रमक सेलिब्रेशनबद्दल आयसीसीने त्याला सामनाशुल्काच्या १५ टक्के दंड ठोठावला आहे. त्याला एक डिमिरिट पॉइंट देण्यात आला आहे. त्याने आचारसंहितेतील कलम २.५ चे उल्लंघन केले आहे. हे कलम आंतरराष्ट्रीय सामन्यात फलंदाज बाद झाल्यानंतर त्याविरुद्ध अपमानास्पद भाषा वापरणे किंवा तसे हावभाव करणे किंवा अशी कृती करणे ज्यामुळे फलंदाजांकडून आक्रमक प्रतिक्रिया येईल, अशा गोष्टींना विरोध करणारे आहे.

# मुंबई इंडियन्सने जिंकले १३ वे विजेतेपद!



■ अंतिम सामन्यात मॅक्सवेलच्या संघाला चारली धूळ

■ रुशील उगारकर ठरला हिरो

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

मुंबई इंडियन्स ही फ्रँचायझी आता फक्त आयपीएलपर्यंत मर्यादीत राहिलेली नाही. या फ्रँचायझीचे अनेक संघ जगभरातील विविध टी २० लीग स्पर्धांमध्ये खेळताना दिसतात. नुकतेच मुंबई इंडियन्स फ्रँचायझीच्या एमआय न्यूयॉर्क संघाने मेजर लीग क्रिकेट २०२५ स्पर्धेचे विजेतेपद रविवारी (१३ जुलै) जिंकले आहे. हे मुंबई इंडियन्स फ्रँचायझीने एकूण सर्व स्पर्धांमधील मिळून १३ वे विजेतेपद आहे. रविवारी एमआय न्यूयॉर्कने शेवटच्या षटकापर्यंत रोमांचक झालेल्या अंतिम सामन्यात ग्लेन मॅक्सवेलच्या नेतृत्वात खेळणाऱ्या वॉशिंग्टन फ्रीडम संघाला ५ धावांनी पराभवाचा धक्का दिला. २२ वर्षीय रुशील उगारकर एमआय न्यूयॉर्कच्या विजयाचा हिरो ठरला. शेवटच्या षटकात त्याने केलेली गोलंदाजी अत्यंत महत्त्वाची ठरली.

या सामन्यात एमआय न्यूयॉर्कने वॉशिंग्टन फ्रीडमसमोर १८१ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना वॉशिंग्टन फ्रीडमला २० षटकात ५ बाद १७५ धावाच करता आल्या.वॉशिंग्टन फ्रीडमकडून मिशेल ओवेन आणि रचिन रवींद्र यांनी डावाची सुरुवात केली होती. ट्रेंट बोल्टने एमआय न्यूयॉर्कला दमदार सुरुवात करून दिली. त्याने पहिल्याच षटकात पहिल्या चेंडूवर ओवनला आणि पाचव्या चेंडूवर अँड्रीय गसला शून्यावर बाद केले. पण त्यानंतर रचिनला जॅक एडवर्डची साथ मिळाली. या दोघांनी ८४ धावांची भागीदारी केली होती. पण एडवर्ड ३३ धावा करून बाद झाला.

पण नंतर रचिनला ग्लेन फिलिप्सची साथ मिळाली. त्यांचीही भागीदारी चांगली रंगली होती. रचिन आक्रमक खेळत होता, त्याने अर्धशतकही केले. पण १६ व्या षटकात रचिनचा अडथळा रुशीलने दूर केला. रचिनचा झेल निकोलस पूरनने पकडला. रचिनने ४१ चेंडूत ८ चौकार आणि २ षटकारांसह ७० धावांची खेळी केली.रचिन बाद झाला तेव्हा वॉशिंग्टन फ्रीडमला २८ चेंडूत ५१ धावांची गरज होती. यावेळी फिलिप्सने आक्रमण केले. त्यामुळे शेवटच्या षटकासाठी वॉशिंग्टन फ्रीडमसमोर १२ धावा करण्याचे समीकरण होते.

पण रुशीलने २० व्या षटकात कमालीची गोलंदाजी केली. त्याने पहिल्या तीन चेंडूवर दोनच धावा दिल्या. त्याने चौथ्या चेंडूवर धोकादायक मॅक्सवेलला मायकल ब्रेसवेलच्या हातून १५ धावांवर झेलबाद केले. त्यानंतर शेवटच्या दोन चेंडूत १० धावांची गरज होती, पण नवा फलंदाज ओबल पिएनारला पाचव्या चेंडूवर एकही धाव घेता आली नाही आणि एमआय न्यूयॉर्कचा विजय निश्चित झाला. पिएनारने शेवटच्या चेंडूवर चौकार मारला, पण वॉशिंग्टन फ्रीडमचा पराभव झाला होता. फिलिप्स ४८ धावांवर नाबाद राहिला.एमआय न्यूयॉर्ककडून गोलंदाजी करताना रुशी उगारकर आणि ट्रेंट बोल्ट यांनी प्रत्येकी ४ षटकात ३२ धावा खर्च करत ४ विकेट्स घेतल्या. तसेच नोस्थुश केंजीगेने १ विकेट घेतली.

तत्पुर्वी, एमआय न्यूयॉर्कने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात १८० धावा केल्या होत्या. मुंबईकडून सलामीवीर मोनांक पटेल आणि क्विंटन डी कॉक यांनी आक्रमक सुरुवात केली होती. त्यांनी ७ षटकातच सलामीला ७१ धावांची भागीदारी केली होती. पण आठव्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर मोनांक २८ धावांवर बाद झाला. त्यानंतर लेगचच तजिंदर धिल्लोन १४ घावांवर माघारी परतला. पण नंतर कर्णधार निकोलस पूरनने डी कॉकला साथ देताना अर्धशतकी भागीदारी केली. पण पूरनचा अडथळा सौरभ नेत्रावळकरने दूर केला. पूरनला त्याने २१ धावांवर बाद केले. १७ व्या षटकात मात्र लॉकी फर्ग्युसनने एमआय न्यूयॉर्कला दोन मोठे धक्के दिले. त्याने अर्धशतक करून आक्रमक खेळणाऱ्या डी कॉकला आणि कायरन पोलार्डला बाद केले. डी कॉकने ४६ चेंडूत ६ चौकार आणि ४ षटकारांसह ७७ धावा केल्या, तर पोलार्ड शून्यावर माघारी परतला. मायकल ब्रेसवेलही ४ धावांवर बाद झाला, तर ट्रिस्टन लुईस ३ धावांवर बाज झाला. पण अखेरीस कुंजरजीत सिंगने केलेल्या आक्रमणामुळे मुंबईने १८० धावांचा टप्पा गाठला. कुंजरजीत २२ धावांवर नाबाद राहिला.वॉशिंग्टन फ्रीडमकडून लॉकी फर्ग्युसनने ३ विकेट्स घेतल्या. तसेच सौरभ नेत्रावळकर, ग्लेन मॅक्सवेल, जॅक एडवर्ड आणि ईयान होलंड यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

# नीरज चोप्रा अन् अरशद नदीम पुन्हा भिडणार




**ऑपरेशन सिंदूरनंतर पहिलीच लढत**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाला होता. त्यानंतर भारताने पीओके आणि पाकिस्तानमधील ९ दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले. तेव्हापासून दोन्ही देशांमध्ये तणाव वाढला असून, त्याचा क्रीडा क्षेत्रावरही परिणाम दिसून येतोय. या सर्वांमध्ये, चाहत्यांना लवकरच भारत आणि पाकिस्तानमध्ये मोठी लढत पाहायला मिळणार आहे. पॅरिस ऑलिंपिक २०२४ नंतर आता पुन्हा एकदा भारताचा भालाफेकपटू नीरज आणि पाकिस्तानचा अर्शद नदीम आमनेसामने येणार आहेत.

नीरज चोप्रा आणि अर्शद नदीम सिलेसिया डायमंड लीग २०२५ मध्ये एकमेकांना भिडतील. ही स्पर्धा १६ ऑगस्ट रोजी पोलंडमध्ये होणार आहे. पॅरिस ऑलिंपिक २०२४ नंतर या दोन्ही दिग्गजांमध्ये होणारा हा सामना पहिलाच असेल. पॅरिस ऑलिंपिक २०२४ मध्ये नदीमने ९२.९७ मीटर थ्रो करून सुवर्णपदक जिंकले होते, तर नीरज चोप्राला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले होते. आता चाहते पुन्हा एकदा या दोन्ही दिग्गजांमधील रोमांचक स्पर्धेची वाट पाहत आहेत. सिलेसिया डायमंड लीग २०२५ ची अधिकृत यादी अद्याप जाहीर झालेली नाही, परंतु आयोजकांनी पुष्टी केली आहे की, दोन्ही खेळाडू या स्पर्धेत सहभागी होतील.

नीरज चोप्राने या वर्षी चांगली सुरुवात केली आहे. त्याने दोहा डायमंड लीगमध्ये ९०.२३ मीटर थ्रो करून दुसरे स्थान पटकावले. हा थ्रो त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी होती. याशिवाय, त्याने पॅरिस डायमंड लीग २०२५ मध्ये ८८.१६ मीटर थ्रो करून पहिले स्थान पटकावले. नीरज चोप्रा आणि अर्शद नदीम यांनी आतापर्यंत १० आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे. दोन्ही खेळाडूंनी एकमेकांना आव्हान दिले असून, ही लढत चाहत्यांसाठी संस्मरणीय ठरली आहे. अर्शद नदीम फक्त एकदाच नीरज चोप्राला हरवू शकला आहे.

## पदकफेरी गाठण्यात नेमबाजी संघ अपयशी

**। लोनाटो । वृत्तसंस्था ।**

लक्ष्य शेओरन आणि नीरू धांडा तिसऱ्या मालिकेत परिपूर्ण गुण मिळवूनही ट्रॅप मिश्र संघ पदक फेरीसाठी पात्र ठरू शकले नाहीत. त्यामुळे आयएसएसएफ लोनाटो विश्वचषकातील भारताची मोहीम संपुष्टात आली आहे. लक्ष्य आणि नीरू यांनी पात्रता फेरीत संभाव्य १५० पैकी १४० गुण मिळवून ५४ जोड्यांमध्ये १० वे स्थान पटकावले. एक दिवस आधी महिलांच्या ट्रॅप स्पर्धेत चौथ्या स्थानावर राहिलेल्या नीरूने प्रभावी कामगिरी सुरू ठेवली आणि ७५ पैकी फक्त एक लक्ष्य चुकवले तर लक्ष्यने दुसऱ्या मालिकेत आपली लय गमावली.

## राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धा

# रायगड जिल्हा प्रथम क्रमांकाचा मानकरी

**। खरोशी । वार्ताहर ।**

सोलापूर सिंहगड इन्स्टिट्यूट येथे १२ व्या राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेचे आयोजन युनिफाईट वेलफेअर आसोसिएशन महाराष्ट्र व सोलापूर युनिफाईट असोसिएशनने १२ व १३ जुलै २०२५ रोजी केल्या होत्या. या स्पर्धेस महाराष्ट्रातुन २० जिल्ह्यातील खेळाडुंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये रायगड जिल्ह्याने ३३ सुवर्णपदक, ११ रौप्यपदक, ९ कांस्यपदक पटकावून संपूर्ण राज्यात अव्वल स्थानी राहुन प्रथम क्रमांकाची चॅम्पियन ट्रॉफी पटकावली.

या स्पर्धेत खेळाडुंना रविंद्र म्हात्रे, जिल्हा प्रतिनिधी युनिफाईट मुख्य प्रशिक्षक प्रशांत गांगर्डे तसेच निलेश भोसले, रोहित भोसले आलोक निर्मल अनुज भोसले, सोहम सावंत, रोहित थळी, दिपेश जाधव या प्रशिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्व यशस्वी खेळाडूंचे युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन, रायगड युनिफाईट असोसिएशन यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र युनिफाईटचे अध्यक्ष संतोष खंदारे, सचिव मंदार पनवेलकर, सोलापूर युनिफाईटचे अध्यक्ष इंगळे, सचिव बाळगे तसेच खजिनदार इकबाल शेख यांनी मेहनत घेतली.

# सिनर विम्बल्डनचा राजा





**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

विम्बल्डन २०२५ स्पर्धेतील पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात अग्रमानांकित यानिक सिनर याने इतिहास रचला आहे. दोन वेळच्या चॅम्पियन कार्लोस अल्कराझला पराभूत करत इटालियन टेनिस स्टारनं पहिल्यांदा विम्बल्डन स्पर्धा जिंकली आहे. याआधी पाचवेळा अल्कराझ आणि सिनर यांच्यात सामना झाला. ज्यात अल्काराझ भारी ठरला होता. पण विम्बल्डनच्या फायनलमध्ये पहिला सेट गमावल्यावर दमदार कमबॅक करत सिनर विम्बल्डनचा नवा किंग ठरला. तो विम्बल्डन स्पर्धा जिंकणारा पहिला इटालियन खेळाडूही ठरला.

यंदाच्या वर्षीही सिनरन ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेतील जेतेपदासह वर्षाची दमदार सुरुवात केली होती. २०२५ च्या फ्रेंच ओपन स्पर्धेत कार्लोस अल्काराझ आणि यानिक सिनर यांच्यात जेतेपदासाठी लढत झाल्याचे पाहायला मिळाले. या लढतीत कार्लोस अल्काराझनं बाजी मारली होती. या पराभवाची परतफेड करत सिनर विम्बल्डनचा नवा राजा झाला आहे.

# फिफा क्लब वर्ल्ड कपच्या फायनलनंतर राडा!

## चेल्सी - पीएसजीचे खेळाडू अन् कोच भिडले, भरमैदानात धक्काबुक्की

**। नवीदिल्ली । वृत्तसंस्था ।**

रविवारी फिफा क्लब वर्ल्ड कप स्पर्धेचे विजेतेपद प्रीमियर लीगमधील संध चेल्सी क्लबने जिंकले. अंतिम सामन्यात चेल्सीने बलाढ्य पॅरिस सेंट-जर्मेन संघाला ३-० अशा फरकाने पराभूत केले. हे तिन्ही गोल चेल्सीने पहिल्या हाफमध्येच केले होते. चेल्सीकडून २२ व्या आणि ३० व्या मिनिटाला कोल पामरने गोल केला, तर ४३ व्या मिनिटाला जावो पेड्रोने गोल केला. मात्र, हा सामना अत्यंत तणावाच्या वातावरणात झाला, सामन्यानंतर तर दोन्ही संघांच्या खेळाडूंमध्ये धक्काबुक्कीही झाल्याचे पाहायला मिळाले.

चेल्सी अखेर ४२ हजार कोटी रूपयात विकली गेली.या सामन्यातच ६ यलो कार्डही दाखवण्यात आले होते, तसेच ८५ व्या मिनिटाला तर पीएसजीच्या जोओ नेवेसला मार्क कुकुरेलाचे केस ओढल्याबद्दल रेड




कार्ड दाखवण्यात आले होते. पण सामना संपल्यानंतर परिस्थिती आणखी बिघडली. दोन्ही संघांच्या खेळाडूंमध्ये धक्काबुक्की सुरू झाली. पीएसजीचे कोच लुईस एनरिक यांनीही यात उडी घेतल्याचे दिसले. ते आणि पीएसजीचा गोलकिपर जियानलुईगी डोनारुम्मा चेल्सीचा स्ट्रायकर जाओ पेड्रोला धक्का देतानाही दिसले. त्यामुळे पेड्रो खालीही पडला. त्यावेळी चेल्सीच्या खेळाडूंनी एनरिकला मागे घेण्याचा प्रयत्न केला. या तणावाच्या वातावरणात नंतर चेल्सीचे प्रशिक्षक एन्झो मारेक्सा देखील मध्यस्थी करायला धावले होते. दरम्यान, साधारण मिनिटभर हा राडा झाला. त्यावेळी दोन्ही संघांचे खेळाडू आणि स्टाफही यात सहभागी झाला होता. या घटनेनंतर एनरिकने स्पष्टीकरण देताना सांगितले की त्यांचा हेतू खेळाडूंना एकमेकांपासून दूर करण्याचे होते. तसेच त्यांनी सांगितले की त्यावेळी खूप तणावाचे वातावरण होते. धक्काबुक्की सुरू होती. पण ही परिस्थिती नक्कीच टाळता येणारी होती. अशा गोष्टी पुन्हा व्हायला नको.

पेड्रोने सांगितले की पीएसजीच्या खेळाडूंनी अँड्रेचा बचाव करण्यासाठी धावला होता. तो म्हणाला, त्याला पीएसजीच्या खेळाडूंनी घेरले होते. त्यामुळे तो त्याचा मित्र आणि संघसहकारी म्हणून त्याच्या बचावासाठी गेला. त्यावेळी धक्काबुक्की झाली. पण अशा गोष्टी होत राहतात. त्यांना पराभूत होणे माहित नाहीये, पण हे फुटबॉल आहे.


**फ्रान्समध्ये मिळवला तिसरा नॉर्म | प्रशिक्षकांना दिलेला शब्द खरा केला**

# हरिकृष्णन भारताचा ८७वा ग्रँडमास्टर

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

जिंकण्याची दृढनिश्चिती आणि समर्पित भावनेने खेळ करताना भारताच्या हरिकृष्णन ए. रा याने भारताचा ८७व्या ग्रँडमास्टर बनण्याचा मान मिळविला.

स्वित्झर्लंड आणि स्पेनमध्ये दोन पात्रता निकष (नॉर्म) मिळविल्यानंतर चेन्नईच्या हरिकृष्णन ए. रा याने फ्रान्स येथील स्पर्धेत तिसरा आवश्यक नॉर्म मिळवून तीन महिन्यापूर्वी प्रशिक्षक श्याम सुंदर यांना दिलेला शब्द खरा केला. युरोपमधील स्पर्धा खेळून आपण ग्रँडमास्टर बनूनच मायदेशी परत येईन असा शब्द हरिकृष्णनने दिला होता. फ्रान्स येथील प्लाग्न आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महोत्सवात २३ वर्षीय हरिकृष्णनने ग्रँडमास्टरचा तिसरा नॉर्म मिळविला. हरिकृष्णन ८७वा भारतीय आणि तमिळनाडूचा ३२वा ग्रँडमास्टर ठरला.



वयाच्या पाचव्या वर्षापासून बुद्धिबळ खेळायला सुरुवात करणाऱ्या हरिकृष्णनने जुलै २०२३ मध्ये स्वित्झर्लंड येथील स्पर्धेत पहिला नॉर्म मिळविला. त्यानंतर दुसरा नॉर्म त्याने स्पेनमधील स्पर्धेत मिळविला. समर्पित भावनेने खेळण्याच्या प्रवृत्तीने वयाच्या सातव्या वर्षीय त्याने फिडे गुणांकन मिळविले. अशी कामगिरी करणारा तो पहिला भारतीय युवा खेळाडू ठरला होता. त्यानंतर २०१८ मध्ये त्याने आंतरराष्ट्रीय मास्टर किताब मिळविला. अर्थात, ग्रँडमास्टर बनण्यासाठी त्याला आठ वर्षे वाट बघावी लागली.

भाऊ वेंकटा कृष्णन याला खेळताना पाहून बुद्धिबळ खेळण्याची मला गोडी लागली. आंतरराष्ट्रीय मास्टर किताब मिळविल्यानंतर मी अनेक वर्षे त्यावरच समाधान मानले होते. साधारण २०२२ पासून मी पुन्हा एकदा बुद्धिबळ गांभीर्याने खेळू लागलो. सातत्याने स्पर्धेत सहभाग घेऊ लागलो. प्रशिक्षक श्याम सरांबरोबर मेहनत वाढवली, असे हरिकृष्णन म्हणाला. विशेष म्हणजे हरिकृष्णनची आई रेनगा नाचर या आंतरराष्ट्रीय आर्बीटर आहे.

ग्रँडमास्टर बनल्याचा आनंद तर आहेच. पण, मला इथेच थांबायचे नाही. युरोपमधील स्पर्धेतून मायदेशी परतताना ग्रँडमास्टर बनूनच परतायचे एक स्वप्न पूर्ण झाले आहे, आता मला मायदेशात पाऊल ठेवण्यापूर्वी माझे गुणांकन २५३० ते २५४०च्या आसपास आणायचे आहे, असेही हरिकृष्णन म्हणाला.

वयाच्या पंधराव्या वर्षी आंतरराष्ट्रीय मास्टर ठरल्यानंतर हरिकृष्णनला ग्रँडमास्टर बनण्यासाठी आठ वर्षे वाट पहावी लागली. ग्रँडमास्टर बनण्याचा आनंद व्यक्त केला आहे.




### पाठोपाठ दुसरा ग्रँडमास्टर

**अनेक वर्ष आंतरराष्ट्रीय मास्टर किताब टिकवून राहिलेला हरिकृष्णन २०२२ मध्ये श्याम मनोहर यांच्या अकादमीत ग्रँडमास्टर बनण्याच्या उद्देशाने दाखल झाला. त्यानंतर हरिकृष्णन याने झपाट्याने प्रगती करत आपले उद्दिष्ट साध्य केले. श्याम मनोहर यांच्यासाठी अभिमानाची बाब म्हणजे त्यांनी काही महिन्यांच्या आत दोन ग्रँडमास्टर दिले. हरिकृष्णनपूर्वी काही महिने आधी त्यांचा दुसरा शिष्य श्रीहरी एल. आर. हा भारताचा ८६वा ग्रँडमास्टर बनला होता.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग- email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयआेनिक १८, आॅर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)